# माणूस

शनिवार । १४ ऑक्टोबर १९७८ । ७५ पैसे

" मला मुसलमानिणीला कोण चांगलं म्हणणार ? गंधर्व मुसलमानिणीच्या नादी लागून खलास झाले अशीच टीका माझ्यावर ज्याने त्याने केली. साऱ्यांनी गंधर्वांची बाजू घेतली, तरफदारी केली. मला समजवून कोणी घेतलेच नाही .... "

**ही गोहरची कैफियत**

" पुढे गोहर आली. तिने सांगितले मी नाशकाला जाते, पैसे देते व गंधर्वांचा गहाण पडलेला ऑर्गन सोडवून आणते. आम्ही तिला पैसे दिले. ऑर्गन आला नाही नि काही नाही. पैसे मात्र गोहर घेऊन गेली. "

" डामरट होती का ती ? "

" Rascal होती. लोकांची गंधर्वांविषयी असलेली सुप्त भक्ती – सहानुभूती जागृत करून पैसे काढणे हा तिचा धंदा झाला होता. नारायणरावांना भिकारीच ठेवले तिने यासाठी .... "

**बडोद्याचे डॉ. कीर्तने यांचा हा अभिप्राय**

बडोद्याचे आणखी एक गंधर्वभक्त बुवासाहेब फडके यांचा गोहरबद्दलचा अभिप्राय आणखीनच कडवट ! डॉ. कीर्तने आणि फडके या दोघांकडे गंधर्व - गोहर यांचा अखेरच्या काळात खूप मुक्काम पडत असल्याने या दोघांचे अभिप्राय उपेक्षणीय खासच नाहीत ....

**मग खरे काय ?**

**खोटे नाटक कोण करीत होते ?**

# गोहर - गंधर्व संबंधांवर नवा प्रकाश

□ □

## मा णू स दि वा ळी अं क

साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक विसावा

१४ ऑक्टोबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

# सामाजिक वधस्तंभ

अशी बरीच मरणे चविष्ट चघळल्यावर
खरे मरण खूपच साहजिक वाटू लागले.
आम्हाला कुणी दम दिल्यावर ओशाळे होणे
जितके प्रतिक्षिप्त तितकेच लोचटणे स्वाभाविक.
मरणाच्या सांकेतिक कल्पना ब्रह्मगाठी गळ्याशी
गुंडाळून आम्ही तपासून पाहिल्या
तेव्हाची गोष्ट –
तो म्हणाला, धर्म सोडा ! नाती जोडा !
मी म्हणालो, तोडले तीन पदर,
बाकी आसपासचा गुंता सोडवू कसा ?
आता तू माझा शत्रू झालास तर
जोडण्याचे पारलौकिक अर्थ कोणत्या
बलिवेदीवर तपासून पहायचे ?
तो सांकेतिक हसला आणि
पुरोगामित्वाच्या तळ्यात डुंबत राहिला.
मी म्हणालो, सूर मारून बघ.
त्याने डोळे खोलून पाहिला
शेजारी वाहणारा एक निरागस झुळझुळता झरा.
तो म्हणाला, हे नको, हे खूप नितळ आहे,
स्वच्छ आहे, निर्मळ आहे.
आमचं फक्त नवीन आहे, प्रामाणिक नाही
इथे डुंबण्यात मजा वाटतो
इथले डुंबता डुंबता गुदमरून मेलेले मासे
चविष्ट लागतात.
मी दोन पावलं पुढे सरकलो
तो त्याचा गुंता अधिकच वाढलेला
पदरांचे दिवस गळफास लावून उभे
आणि तो गुंत्यातच गुरफटलेला, पुटपुटला –
आकाश निरभ्र आहे
आभाळात ढग नाहीत
आता स्वस्वरुपाचा गजर करून अनिष्टाची
आहुती देऊ या
तर्पण शब्द फारच रूढ वाटला त्याला
म्हणून त्याने बोटांवरून अलगद पाणी सोडले
आणि वधस्तंभावरून लालभडक रक्ताचे डाग ओघळले
कुणी तरी ओरडले
अरे, हे पूर्वजांचं तेजोमय महास्मारक जपा रे !
कावळ्यांनो ! तुमच्या पिलाशपथ कधी शीटू नका
नगरपालिकेच्या समस्त अंतर्योजना
जिल्हा परिषदांच्या अनंत कमिट्या
महापौरांचा गलेलठ्ठ निधी

राज्याच्या शिलकीचं अंदाजपत्रक
आणि देशाची पंचवार्षिक योजना......
अशा अजस्र योजनांमधून तुमच्या शरीरस्वच्छतेसाठी
आम्ही स्वतंत्र फंड उभा करू !
समित्या नेमू ! त्याचे अहवाल नियमित छापू !
वाटल्यास तुमच्या मागण्या मान्य करून
तुमच्यासाठी तुमच्या विरोधकांचे पसरट मेंदूंचे
पुतळे आम्ही उभे करू.......पण तुम्ही
ह्या वधस्तंभावर बसू नका
बसलात तर पाय झडतील, पंख फडफडतील.
कावळ्यांनो ! तुम्हालाही विटाळण्याची
शक्यता निर्माण होऊ पाहतीय.
भांडू नका ! प्रत्येकाचा पुतळा वेगळा
त्यात लवाद नाहीत, आयोग नाहीत
मात्र हे वधस्तंभ जपायलाच हवेत
धमन्यांतून वाहणारी गरमगरम रक्ताची शिर
टचकन फोडून आमचे सामाजिक अस्तित्व
हजारो घटनांनी लिहून काढलेय ह्याच्यावर !
मरणोन्मुख डोळ्यांनी खडाखडा वाचताना
थेंबांचे सर्ग काळाच्या सीमारेषा ओसंडून
पुढे धावतील
ही सीमा ओलांडू नका
वधस्तंभाच्या पहारेकऱ्यांनो,
आपणच जपायला हवेत ना हे
ऐतिहासिक संदर्भ
अन्यथा आपले लक्तरलेले वाभाडे
ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन दारोदार, रानोमाळ
उडून जातील. त्याचा हिशेब कुणी करायचा ?
वेचतावेचता युगांनाही धाप लागेल
सत्ययुग अवतरण्याची कल्पना कुणी केली
तर कली त्याला क्षमा करो
अशी क्षमाशील अक्षरं स्तंभाला मानवत नाहीत
ज्यात नाही विद्रोह, विस्फोट
कधी कधी उगाच, जाणूनबुजून
वा सांगूनही किंवा घडवूनही
असे सारे काही स्तंभ पचवते.
रस्तोरस्ती, गावोगावी असणारी प्रचारयंत्रणा
स्तंभाचे एक एक अक्षर अमर करते.
स्तंभाला विद्रोहाची लालभडक जीभ आहे.
गिळता येते सारे काही जिभेने
प्रश्न नसतो फक्त हाडांचा सापळा
करून जगणाऱ्यांचा कारण जिभेला हाड नसते–
अशी त्रिकालाबाधित सत्ये स्तंभाच्या
फाउंडेशन स्टोनमधेच लपून बसलेली आहेत.
भीती वाटते त्यांना प्रखर सूर्यप्रकाशाची !
सोन्यात तेजाळून निघतात काळे पत्थर
नितळ फिक्के रंगीत संगमरवर

जसे पांढरेफेक चेहरे गच्च गोलाकार !
गुबगुबीत पाखरांना स्तंभाजवळ येण्यास
कायमचा परवाना आहे.
स्तंभ बांधला तेव्हाची गोष्ट
किती तरी नितळ, निरागस चेहरे
शांतपणे निद्रिस्त झाले.
माणसे रचली गेली शिळा समजून
पण बेटे माणसांचे रक्त असे जातिवंत
दोन दगडांमधून रक्ताचे पाट वाहिले खरे
पण दगडांची काही एकजीव संघटना उभी राहिली नाही
दगड ओरडले, त्यांनी निषेध केले
आपल्या खाचांमधून वेडेवाकडे बसून त्यांनी
काळी पार्श्वभूमी स्तंभाला निर्माण करून दिली
तशी स्तंभस्थापनेची चळवळ अधिक जोमाने फोफावली
इमानेइतबारे दगड वाहणाऱ्या एका देहाला विचारले
ह्या स्तंभावर कोणाला स्थापणार ?
तो दात विचकून हसला.
त्याचं हसणं त्याच्या शरीरावरून वाहणाऱ्या
घामाच्या पाटांमधून सळसळणाऱ्या सापासारखं
वळवळत गेलं.
दातांचा स्पर्श नसलेले ते शब्द विलक्षण
धारदार करवतीसारखे माझी शहाणीसुरती नजर
कराकरा कापीत गेले.
त्याला म्हणालो, स्वातंत्र्य म्हणजे काय ?
तो म्हणाला, पोट !....दोन भाकऱ्या !
एक सूर्याची...दुसरी चंद्राची !
वाटलं, त्याला थोडंसं हलवून टाकावं
भडकून द्यावा असाही एक अग्नी जो उसळणे
म्हणजे केवळ अपरिहार्य शक्यता असते.
म्हणालो, तुला आपण कशासाठी जगतोय
असं नाही वाटत ?
स्तंभाच्या छायेत आडोसा करून बसलेल्या
त्याच्या थेरड्यांकडे त्याने पाहिलं
बघता बघता त्याची नजर हिंस्र बनली.
वाटले, झाले काम फत्ते ! आता खरोखरीच
वणवा उठणार ! सारी सृष्टीच ह्या
अक्राळविक्राळ दृष्टीने भयचकित होईल !
एखादी निसर्गाची करुणार्त किंकाळी
आसमंत आरपार छेदून जाईल
आभाळाची लक्तरं लोंबू लागतील
पण घडले ते विपरीतच
त्याची नजर खाली वळली आणि शरीर
अंथरून तो म्हणाला,
बोलू नका ! स्तंभ पुरा व्हायला हवा !
मी माझी कमरेची लंगोटी आत टाकतो
तुम्ही तुमच्या पाठीवरचा पदवीचा कागद टाका.
असे कागद कुंड्यांवर मिळतात लागेल तेवढ्या

अथवा कुंडचा शहराशहरात विखुरलेल्या असतात
त्याला उभा पेटवला असता तर
कापरासारखा भुरुभुरु जळून गेला असता
मग मीही धावलो आगेमागे
...........प्रचंड जमाव चाललेला
घोषणांचे सुरुंग पेटवीत जागोजाग
रस्त्यारस्त्यावर शब्दांचे भूकंप जणू
बघता बघता आभाळाचे पडदे भराभरा जळू
लागले अक्षराअक्षराने,
टराटरा कापून टाकली वीज
चांदण्यांचे दिवे काळेठिक्कर पडले
घोषणांच्या पेटत्या गोळ्यांनी
आणि आभाळाचा धूरच धूर सर्वदूर
पृथ्वीभर व्यापून राहिला
काळाकभिन्न.........धुकट धूर.......
कळेना रात्र कोणती, दिवस कोणता
माणूस कोण, पशू कोण
माजलेल्या रणकंदनात कोटचवधि पावलांनी
खचू लागली माती
खवळलेल्या समुद्राने शेषाची मान पिरगळून
टाकली आणि रक्तामासाच्या चिखलाचे
हजारो हात थयथया नाचू लागले
नुस्ता हलकल्लोळ.......अरे ! तू कोण ?
हा, ही, ती कोण ?
मला माझ्याजवळ माणूस हवा, माणूस !
कुणाचा तरी शर्ट सापडला, मी विचारलं,
तू कोण ? तुझी जात कोणती ?
तुझं नाव काय ? तुझं गाव कोणतं ?
तो जोराने खिंकाळला आणि हातातून
शेपूट गळून पडली, कुठून तरी आवाज आला
मी नामांतराचा पाईक
तुमची नावे तुम्हाला लखलाभ, ह्या नावांची
होळी आपण चंद्रलोकावर साजरी करू या,
अरे मूढांनो ! हा पहा चिरंजीवनामकोश !
ह्यातून मानवनिर्मित अस्तित्व गळून पडले आहे.
जखमेतून रक्त भळभळ वाहून जावे तसे !
तुम्ही कधीच समाजाच्या शरीरामधून
फुटून बाहेर गेला आहात,
आता रस्ते तुमचे .... जखमा तुमच्या
डाग तुमचे ! .... गोठून गारठून गेलात
तरी कुणी महात्मा तुम्हाला जमा करणार नाही.
आम्ही ज्याची वाट पहात होतो त्या साऱ्या
कहाण्या होत्या ! विराण्या होत्या !
........ आणि नुस्ते रणभेदी आवाज
मर्मकठोर .... कानशिले फाडून जाणारे ....
शरीराला छिन्नविच्छिन्न करणारे ........
दूर पानात संधिप्रकाश थरथरला
आणि वाऱ्याची झुळुक झुळझुळली
तसा सारा आसमंत किंचित् करून
निवांत होऊ लागला .... अनावर सन्नाटा
सुन्नतेच्या सुया काळजात खुपसलेल्या
सगळ्यांच्या जशा
आणि सारे जगच मरणप्राय शांततेच्या बेशुद्धावस्थेत
मी शतकानुशतके मिटलेले डोळे उघडले
किलकिल्या डोळ्यांनी आसपास पाहिले
वधस्तंभाची जिज्ञासा पापण्यातून ओसंडून
वाहात होती
असत्या शरीरानिशी सरपटत गेलो.
स्तंभाचा भरभक्कम पाया रक्तबंबाळ
धारांनी नाहून निघाला होता आणि
कोणत्या तरी हिंस्र तेजाने चमचम करीत होता
त्या भयानक प्रकाशाची एक लकेर माझ्याही
नजरेला भोवळून गेली
काही तरी वीजेसारखे पांढरेधोक चमकले
आणि मागून शब्द फुटले
स्तंभाचा रक्षक तूही आहेस.
मी आक्रंदलो तो ओठच उघडेना.
हरवून स्तंभावरले एकेक अक्षर जुळवून वाचू लागलो
हा माझाही पराभव आहे
आणि खाली माझे नाव.
मी हळूच नजर वर उचलली
आणि एक एक नाव वाचताना माझ्या काळजाचा
एकेक तुकडा आभाळभर होत गेला
तिथे टॉलस्टॉय होता
शेक्सपिअर होता
पण नव्हता स्टॅलिन; लेनिन
होता मॅक्झिम गॉर्की
आणि अल्बेर कामू
पण नव्हता हिटलर
होता लिओनार्डो
तसाच गॅलिलिओ
पण नव्हता आपल्या थुंकीने शहरे भिजवून
टाकणारा बलाढच रक्तपिपासू
पाहिले रवींद्रनाथ
आणि ज्ञानेश्वर .........आणि ....
मी जोराने ओरडलो ....
स्तंभाचा उद्देशच फसला होता
त्याचं अस्तित्वच सरलं होतं
कारण
दात विचकून हसणारा मनुष्य
तुटलेली बोटं घामात बुडवून
स्वतःचंच नाव स्तंभावर लिहित होता.

—किशोर पाठक

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

## □ शरशय्येवरील उषास्वप्नं

तसं म्हटलं तर गेली दोन-एक वर्षं, म्हणजे डायलिसिसशी जखडले गेल्यापासून, जयप्रकाश नारायण राजकीयदृष्ट्या पूर्णपणे निष्क्रियच आहेत. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सत्ताधाऱ्यांची गांधीजींविषयीची जी प्रतिक्रिया व्हायला लागली होती, तीच प्रतिक्रिया जनता पक्ष सत्ताधाऱ्यांची जे. पीं.विषयी झाली असली—म्हणजे कुणाला ते निरुपयोगी, अडगळवजा वाटत असले—किंवा त्याहीपुढे जाऊन थेट उपद्रवकारक वाटत असले तर त्यात फारसं नवल वाटायचं कारण नाही. अर्थात जनता राज्याच्या या कालखंडात जे. पी. निष्क्रीय असले, तरी अलिप्त निश्चितच म्हणता येणार नाहीत. पंतप्रधानपदासाठी मोरारजीभाईंचे नाव निश्चित करण्याचा वादग्रस्त निर्णय आचार्य कृपालानींच्या भागीदारीत घेतल्यानंतर काही काळ जे. पी. अलिप्त झाल्यासारखे वाटले खरे; परंतु सामान्य लोक, पत्रकार आणि राजकारणी या तिघांनीही त्यांना तसं फार काळ राहू दिलं नाही. जनता पक्षाच्या घटकपक्षात सुरू झालेली कचकच आणि बड्या नेत्यांमधली सुंदोपसुंदी यामुळे जनता राज्याचं तारू जसजसं दिशाहीन भरकटायला लागलं, तसतशी जे. पीं.कडची गर्दी पुन्हा वाढायला लागली. यात सुरुवातीला तरी मोठा वाटा उचलला तो पत्रकारांनी. जे. पीं.च्या प्रतिक्रियावजा मुलाखती सद्यःस्थितीच्या संदर्भात मिळवून छापण्याचा सपाटा सुरू झाला. यात क्वचित असंही घडलं की, एखाद्या मुलाखतीत भावनेच्या भरात व्यक्त केलेली तीव्र प्रतिक्रिया, जराजर्जर आणि व्याधिग्रस्त जे. पीं.च्या ध्यानातच राह्यची नाही आणि पुढच्या मुलाखतीत त्याविरुद्ध, विसंगत असं काही तरी बोलून किंवा तिचा साफ इन्कारच करून ते दोषाचे धनी व्हायचे. जे. पीं.चं वय आणि प्रकृती लक्षात घेता त्यांच्यावर हा अन्यायच होता, यात शंका नाही. बरं, जे. पी. राजकारणापासून पूर्णतः अलिप्त राहिले असते तर हा काही प्रश्नच उद्भवला नसता; पण त्यात पूर्णतः सहभागी होऊ शकत नसलेल्या या मनस्वी आधुनिक भीष्माला शरपंजरी पडल्यानंतरही त्यातून पूर्णतः निवृत्त होणं शक्य होत नव्हतं. जे. पी. बोलत राहिले. क्वचित सततच्या संपर्काअभावी अपुऱ्या माहितीच्या आधारानंही बोलत राहिले—आणि पत्रकार छापत गेले. ते तरी बिचारे काय करतील? भरपूर गाजावाजा करून जन्माला घातलेल्या या जनता-टेस्ट ट्यूब बेबीची तब्येत अशी दिवसेंदिवस खंगत-खालावत का जावी, हा प्रश्न अखेर त्या अचाट प्रयोगाच्या एका कर्त्याकडे न्यावा लागला तर त्यात त्यांची काय चूक आहे?

आणि जनता पक्षाचा आजचा दारुण तमाशा पाहून अंतर्यामी व्यथित झालेले जे. पी.सुद्धा त्या प्रयोगाचे आपले कर्तेपण नाकारीत नाहीत, पण दीर्घ प्रतीक्षेनंतर जन्मलेल्या एकुलत्या एका पोरानं लाडाकोडात वाढल्यानंतर लाथा झाडायला सुरुवात केली, तर वृद्ध पित्याची व्हावी, तशी होणारी आपली तडफड ते लपवूही शकत (इच्छीत?) नाहीत. 'जनता पक्ष हे काही अंशी माझंच अपत्य आहे,' अलीकडच्या एका मुलाखतीत त्यांनी म्हटलंय, 'पण दुर्दैवानं त्याच्या जन्मानंतर थोड्याच काळात या दुर्धर रोगानं मला पछाडलं आणि त्यामुळं त्याच्या वाढीकडे मला काहीच लक्ष पुरविता आलं नाही. सत्ता आणि पदाची लालसा असणारी मंडळी पुढं सरसावली आणि आम्ही प्रारंभीच्या काळात निर्माण केलेल्या जनतेतल्या उत्साहाचा त्यांनी स्वार्थासाठी गैरवापर केला.'

कांतिलाल—सुरेशकुमार प्रकरणांचा उल्लेख मुलाखतीत येणे अपरिहार्यच होतं. जे. पीं.ची त्यावरची प्रखर प्रतिक्रिया अशी—'जे घडलं ते घडून गेलं. त्यात आता काही बदल करता यायचा नाही; पण यापुढं निदान एक गोष्ट करता येईल. सत्ताधाऱ्यांची मुलं-मुली आणि नातेवाईक यांनी सरकारी निवासस्थानात राहू नये. या नेत्यांनीही, त्यांच्या भेटी-गाठी ठरविण्यासारखं सचिवपदाचं काम पगारी सेवकांवरच सोपवावं, मुलांवर वगैरे नव्हे. एरवी प्रत्यक्षाविषयी लोकमतात गैरसमज निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीत.'

**प्रश्न :** १९७४ मध्ये तुम्ही 'संपूर्ण क्रांती'साठी आंदोलनाची एक हाक दिलीत, तेव्हा त्यात उडी घेतलेल्या तरुणांनी सद्यःस्थितीत कोणता मार्ग स्वीकारावा असं तुम्हाला वाटतं?

**उत्तर :** अशा तरुणांनीच आता एकत्र येऊन विचारविनिमय करावा आणि आपला कार्यक्रम आखावा. मी किंवा इतर कुणी त्यांना उपदेश करण्यापेक्षा हाच मार्ग अधिक विधायक ठरेल. (तात्पर्य : काळ आणि शासन बदललं की, विधायकतेच्या व्याख्याही बदलतात!)

**प्रश्न :** पण जे. पी. स्वतःचा मार्ग स्वतःच शोधून काढता यावा इतकी 'संपूर्ण क्रांती'ची कल्पना त्या मुलांना समजलीय् असं वाटतं तुम्हाला? कारण तसे हे तरुण सारखेच एकत्र यतात, बोलतात; पण आंदोलनाचा हरवलेला प्राण, हरपलेली गती ते पुन्हा कशी प्राप्त करून देणार आहेत?

**उत्तर :** मी त्या वेळी मांडलेल्या सर्वच कल्पना त्यांना समजतीलच असं नव्हे; पण आता त्यांनी एकत्र येऊन आपल्याला काय करता येईल, याचा विचार करावा. यात त्यांना ज्या ज्या विशिष्ट अडचणी दिसतील, न सुटणारे जे प्रश्न समोर येतील, ते घेऊन त्यांनी मार्गदर्शनार्थ माझ्याकडे यावं किंवा इतर कुणाकडे जावं. आणि संपूर्ण क्रांतीच्या वाटचालीची गती मंदावलय, हे मात्र खरं.

पृष्ठ २४ वर

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## ▢ अंधांसाठी आशाकिरण

अनेक वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या राष्ट्रीय अंधसंघटनेतर्फे गेली १५ वर्षे मुंबईत अंधांसाठी एक कार्यशाला ( Work shop ) चालविण्यात येते. दरवर्षी सुमारे शंभर अंधांना, रस्त्यावर चालावे कसे इथपासून उद्योगव्यवसायाला पूरक असे तांत्रिक शिक्षण या कार्यशालेत दिले जाते.

या संस्थेला जवळून निरखण्याचा योग आला तो परवाच तिथे सुरू झालेल्या एका नव्या उपक्रमामुळे ! अंध तरुणांना नोकरी मिळणे म्हणजे महामुश्किल गोष्ट. त्यांना एखादा स्वयंरोजगार मिळवून द्यावा या उद्देशाने या कार्यशालेतील प्रशिक्षित अंध तरुणांसाठी विविध वस्तूंचे सुमारे ४७ स्टॉल्स मुंबईत उघडण्यात येत आहेत. या स्टॉल्स योजनेच्या औपचारिक उद्घाटनाचा कार्यक्रम गेल्या बुधवारी अंधांच्या कार्यशालेतील क्वीनी कॅप्टन सभागृहात पार पडला.

' अंधांसाठी स्टॉल्स ' या योजनेचा एकूण खर्च १,४१,००० रु. एवढा आहे. सहजपणे एका जागेवरून दुसऱ्या जागेवर नेता येईल अशा पद्धतीचे – सरकारी दूध विक्री केंद्रांचे असतात तसेच – हे स्टॉल्स ( किंवा टपऱ्या ) आहेत. स्टॉल्सच्या या योजनेवर कार्यशालेच्या संचालकांनी साधकबाधक विचार केल्यानंतर ही योजना प्रत्यक्षात येण्याच्या मार्गात पहिली अडचण आली ती जागेची. हे स्टॉल्स उभारणार कोठे ? पोलिसांनी त्याला हरकत घेतली तर ? ते अनधिकृत ठरविले गेले तर ? अशा अनेक प्रश्नांना सामोरं जाणं भाग होतं.

पण खऱ्या अर्थाने डोळस असलेला कोणताही माणूस अंधांना उपकारक ठरणाऱ्या या योजनेला विरोध करणार नाही. महापालिकेचे ( सेवानिवृत्त ) उपआयुक्त श्री. एस्. आर. राणे हे त्यांपैकीच एक म्हटले पाहिजेत. त्यांना ही योजना आवडली आणि पोलिसांची परवानगी ज्या जागेसाठी आवश्यक नसते त्या, पालिकेच्या ' सुरक्षित विभागातील ' निवडक ४७ ठिकाणांची यादीच राणेसाहेबांनी कार्यशालेकडे पाठवून दिली.

सरकारी अधिकारी इतक्या सहृदयतेने आणि पुन्हा इतक्या तत्परतेने मदत करू लागल्यावर कार्यशालेच्या अधिकाऱ्यांचाही उत्साह दुणावला. एम्. व्ही. मंगसुळीकर या एका कार्यक्षम आणि तडफदार गृहस्थाची लगेचच प्रकल्पअधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. मंगसुळीकरांची कामाची हातोटीच इतकी प्रभावी की, अवघ्या चार महिन्यांत १२ औद्योगिक कंपन्यांकडून ४७ स्टॉल्सना येणारा सर्व खर्च देणगी म्हणून मिळविण्यात ते यशस्वी झाले. या प्रत्येक स्टॉलला रु. ३,००० प्रारंभिक खर्च येणार आहे. यांपैकी २८ स्टॉल्स वेगवेगळ्या सिगरेट कंपन्यांनी देणगी म्हणून दिले असून त्या स्टॉल्सवर त्यांच्या सिगरेट्स् व इतर काही सामुग्री विकण्यात येईल. याशिवाय कॅडबरी, पार्ले बिस्किट इ. कंपन्यांनी देणगी म्हणून दिलेले स्टॉल्स त्यांच्या उत्पादनाची विक्री करतील.

या स्टॉल्सवर विक्रीव्यवहार करणं ही अंधांसाठी सोपी गोष्ट नाही. म्हणूनच या स्टॉल्सवर काम करण्यासाठी काही विशिष्ट चाचण्या घेऊन अंधांची निवड केली गेली. पैसे बरोबर मोजून घेणे व योग्य ती वस्तू देणे या व्यवहारांचा त्यांच्याकडून सराव करवून घेतला गेला.

पण असे प्रशिक्षित अंधच केवळ विक्रेते म्हणून नेमले तरी इतरही अनेक अडचणी आहेतच. त्या सोडविण्यासाठी अंधांच्या या स्टॉल्सवर त्यांचा एक विश्वासू नातेवाईक दिवसातला बराच काळ राहील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अंधाच्या अनुपस्थितीत मुख्यत: ही व्यक्ती जबाबदारी सांभाळील. चोरी, आग आणि अपघातापासून संरक्षण मिळण्यासाठी अशा प्रत्येक स्टॉल्सचा विमा उतरविण्यात आला आहे.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या स्टॉल्सवर विकल्या जाणाऱ्या सर्व वस्तू या अंध विक्रेत्यांना, वस्तूंचे उत्पादक ' ना नफा ना तोटा ' या तत्त्वावर देणार आहेत. स्टॉलवरची विक्री-किंमत मात्र बाजारभावाइतकीच रहाणार असल्यामुळे अंध-विक्रेत्यांना मोठाच आर्थिक फायदा होणार आहे.

ही योजना यापुढेही राबविण्याचा कार्यशालेचा विचार आहे. सरकारी दूधयोजना, मफको, मध्यरेल्वे इ. च्या सहकार्याने विविध वस्तूंचे स्टॉल्स अंधांना चालविण्यासाठी देण्याची ही योजना विस्तारित स्वरूपात राबविली जाईल. तांत्रिक किंवा कुठलेच शिक्षण घेऊन नोकरी मिळविण्यास असमर्थ ठरणारे असे जे अंध आहेत त्यांना ही योजना म्हणजे नवा प्रकाश ठरेल.

या निमित्ताने ही योजना राबविणाऱ्या राष्ट्रीय अंध संघटनेच्या ' कार्यशालेचा ' परिचय करून द्यायला हवा.

१९६३ साली ही कार्यशाला स्थापन करण्यात आली. अनेक धनिकांनी दिलेली मदत आणि सरकारी अनुदान यांच्या बळावर या संस्थेचा सर्व कारभार चालतो. सर्वसाधारण प्रतिवर्षी या संस्थेला एक लाखाच्या आसपास देणग्या मिळतात व सरकारी अनुदानही जवळजवळ तितकेच. हा सगळा पैसा सुमारे शंभर अंधांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी वापरला जातो. हलके व सोपे अभियांत्रिकी काम, शिवणकला, यांत्रिक भागांची जुळवणी, सुतारकाम, ब्रश व तागाच्या वस्तू तयार करणे, टेलिफोन ऑपरेटिंग इ. च्या प्रशिक्षणाचा समावेश असलेला दोन वर्षांचा एक अभ्यासक्रम या अंधजनांना दिला जातो. या काळात त्यांना प्रत्येकी ७० ते १०० रु. पर्यंत विद्यावेतनही मिळते. मुंबईत ज्यांची रहाण्याची सोय नाही अशा किमान ५० अंध प्रशिक्षणार्थींची रहाण्या–जेवण्याची सोयही ही कार्यशाला आपल्या वसतिगृहात करते.

या कार्यशालेत अशा विद्यार्थ्यांसाठी भोजनालय व उपहारगृह आहे. शिवाय ' बोलक्या पुस्तकांचे ' एक सुसज्ज ग्रंथालयही आहे. ब्रेल लिपीच्या संशोधन व सुधारणेसाठी एक स्वतंत्र विभाग आहे.

पृष्ठ २० वर

# आम्ही संशोधिलेले नवे

# ' वसंत ' जातक

ग्यानबा

जातक हा एक धर्मग्रंथ आहे.

आपआपल्या मर्यादा ओळखून स्थूल व्यवहारापलीकडे नजर टाकायला तो सार्‍यांना सांगतो.

' जातक ' याचा अर्थ 'जन्माची हकीकत ' असा होतो.

बोधिसत्त्वाच्या पूर्वजन्मीच्या या कथा आहेत. याला ' अतीतकथा ' म्हणतात.

ही सांगण्यापूर्वी ' वर्तमानकथा ' येते.

शेवटी दोन्ही कथांतल्या पात्रांची सांगड घालून फोड केलेली असते.

–दुर्गा भागवत
' सिद्धार्थ जातक '
खंड पहिला, प्रस्तावना

काशीराज्यात ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असताना एकदा असे घडले. राजा जेतवनात शास्त्याची धर्मकथा ऐकत असताना विदर्भातील एक पौरजन उभा राहून म्हणाला–

' राजा, तुला ही धर्मकथा ऐकण्याचा अधिकार नाही, तुझ्या राज्यकारभारात अनेक लाचखोर आहेत, असे तुझाच एक मंत्री सतत खाजगीरीत्या सांगतो. मी यासंबंधी सर्व पुरावे गोळा केले असून उदईक दरबारात मी ते सादर करीन ! '

राजाने दरबार भरविला. ब्रह्मदत्ताचे सर्व मंत्री दरबारात हजर होते. पौरजनांची दाटी झाली होती. भर चौकात दोषी मंत्र्यांना मृत्युदंड देण्यासाठी वधस्तंभांना तेल-पाणी केले जात होते. पौरजनात दोन तट पडले होते. राजाचे मंत्री लाचखोर आहेत, असे मानणारा पौरजन पुढील गाथा मोठ्याने म्हणाला–

' विश्वासाने न मंत्र्याशी
असत्यवादकी तसे
विश्वासाने न पाप्याशी
ढोंगी साधुशीही तसे ।।
सुकी ओंजळ धरिती,
बोले लपविती मना
ऐशा फोल मंत्र्याशी
विश्वासावे मुळीच ना ।।

यावर लगेच मंत्र्याची कड घेणारा पौरजन उच्च आवाजात गरजला–

मित्ररूपे विदर्भी, शत्रू ते गुप्त वागती
त्यजावे त्यां, जसे त्यजिले कुक्कुटे श्येनकाप्रती ।।
स्वतःचे गुह्य सांगे ना
दुज्याचे गुह्य फोडतो
लाभता भोजन सुग्रास,
मित्रस्मृति न ठेवतो ।।

दरबारात ब्रह्मदत्त स्थानापन्न होईपर्यंत असा गदारोळ सुरू सुरू होता. ब्रह्मदत्त येताच दरबारात शांतता पसरली. ब्रह्मदत्ताने म्हटलं,

' वैदर्भी विप्राने पुढे येऊन आपले आरोप सांगावे व सिद्ध करावे ! '

वैदर्भी विप्र जागचा उठेना, तेव्हा पुन्हा दरबारात ओरडा झाला. अखेर त्या विप्राने उठून सांगितले–

' आरोप करण्याचे व ते सिद्ध करण्याचे मी तूर्त स्थगित केले आहे ! '

विप्राचे हे बोलणे ऐकून पौरजनात संतापाची एकच लाट उसळली. त्यांना शांत करीत ब्रह्मदत्ताने ही गाथा म्हटली–

विप्राचे सोंग सजवितो,
हाती धरूनि दर्भ
सोंग हे गर्भारशीचे, पाटी
नसता गर्भ ।।

शास्त्याला जेतवनात जेव्हा ही हकिगत कळली तेव्हा तो म्हणाला–

' पूर्वीही असे घडले आहे. '

असे म्हणून वसंतसेनेची गोष्ट त्याने सांगितली.

गौतमाला बोधी प्राप्त झाली त्या पहिल्या काळात त्याला पुष्कळच अनुयायी मिळाले. त्याच्या गुणांची फार मोठी ख्याती झाल्याने त्याला मोठमोठे लाभ–सत्कार मिळू लागले. त्याच्यापुढे बाकीचे श्रमण सूर्यापुढे काजवे ठरले. त्यांचे लाभ–सत्कार थांबले, त्यांना कुणी विचारीना. ते रस्त्यात लोकांना म्हणू लागले–

' हाच तेवढा का बुद्ध आहे ? आम्ही आहोत. आमचा सत्कार केलात तरी पुण्य लागेलच ! '

परंतु लोक या इतर श्रमणांकडे लक्ष देईनात. तेव्हा ते सर्व एकत्र जमले व कुठल्या उपायाने माणसांच्या मनात नावड उत्पन्न करून गौतमाचे लाभ–सत्कार थांबवता येतील आणि त्याचे अनुयायी नासून टाकता येतील, याचा खल करू लागले.

त्या वेळी श्रमनवस्तीत वसंतसेना नावाची अतिशय लावण्यसंपन्न स्त्री रहात होती. एक दुष्टबुद्धी श्रमण म्हणाला–

' वसंतसेनेतला मथवून गौतमाबद्दल कंडी उठवू या, म्हणजे तो लोकांच्या मनातून उतरेल ! '

' आहे खरा नामी उपाय, ' असे म्हणून बाकीच्यांनी पुष्टी दिली.

सर्वजण वसंतसेनेकडे आले. तिला त्यांनी नाना आभरणे घातली. पैसे दिले व विनंती केली–

' बाई, जर तुला आमच्या हिताची काळजी असेल तर तू आपला संबंध गौतमाशी जोडून त्याला बदनाम कर ! '

वसंतसेना म्हणाली–

' ठीक आहे. आर्यांनो, ते माझकडे लागले. '

मग वसंतसेना रोज सायंकाळी नटूनथटून घराबाहेर पडून जेतवनातील अतिथिगृहात येऊन राहू लागली. अगदी पहाटे नगरातले लोक गौतमाच्या दर्शनाला येऊ लागले की, वसंतसेना जणू आपण गौतमाच्या

घरातूनच बाहेर पडत आहोत असे दाखवीत नगराकडे जाऊ लागायची.

'कुठे गेली होतीस?' असे कुणी विचारले तर फणकाऱ्याने भुवया उडवीत ती म्हणायची—'

'तुम्हाला कशाला या चौकश्या?'

लोकांच्या कुतूहलाने हळूहळू पुरेसा पेट घेतला. दुष्ट श्रमणांकडून तिला जी आभरणे व दागिने मिळत, ते सर्व गौतमानेच आपल्याला दिले, असे ती आडून आडून सुचवीत असे. यामुळे पौरजनात गौतमाच्या चारित्र्याविषयी कुजबूज वाढत चालली.

तीन-चार महिने याप्रमाणे आपला व गौतमाचा चोरून संबंध असल्याचा संशय सर्वत्र पसरवल्यावर, एक दिवस तिने पोटावर फडकी बांधून गरोदरपणाचे नाटक सुरू केले.

गौतमाचा गर्भ आपल्या पोटात वाढतो आहे, अशी तिने भाबड्या आणि मूर्ख लोकांची समजूत करून दिली.

गर्भ दिनीप्रतिदिनी वाढत होता. चार-पाच महिन्यांनी पायावर सूज आली आहे व आपण अगदी गळून गेलो आहोत, असे ती सांगू लागली. मग एके दिवशी तथागत धर्मोपदेश करीत असताना, वसंतसेना तिथे गेली. गौतमासमोर उभी राहून म्हणाली—

'महाश्रमण, तू लोकांना धर्मोपदेश करतोस. तुझं बोलणं गोड आहे; पण तुझ्यापासून मला गर्भ राहिला आणि आता दिवस भरत आले तरी तू माझा स्वीकार करीत नाहीस! तुला भोग घेणं ठाऊक आहे; पण बाळंतपण करणं ठाऊक नाही!'

तथागताने धर्मकथा थांबवली आणि सिंहाप्रमाणे गंभीर आवाजात तो म्हणाल्या—

'भगिनी, तू सांगितलंस ते खरं किंवा खोटं हे तू आणि मी दोघंच जाणतो.'

'खरंच आहे! जे झालं ते तुला नी मलाच ठाऊक आहे!'

तथागत म्हणाला—

'न घडलेल्या गोष्टीबद्दल कोणाची निंदा करणे सोपे आहे; पण खोटे गरोदरपण निभावून नेणे तेवढे सोपे नाही!'

आपल्याला हा बधत नाही असे पाहून वसंतसेना गौतमाला म्हणाली—

'तुला उपरती होईपर्यंत मी बाळंतपण स्थगित करते आहे!'

इतक्यात उंदराच्या पिल्लाच्या रूपाने एक देवदूत हजर झाला व त्याने वसंतसेनेच्या पोटावर गुंडाळलेली दोरी कुरतडून टाकली. तिच्या नेसत्या वस्त्राखालून सर्व चिंध्या व फडकी खाली पडू लागली. पृथ्वी दुभंगली आणि वसंतसेना गर्तेत पडली!

धर्मसभेतील एक भिक्षू म्हणाला—

'उदार गुणाच्या गौतमाला न घडलेल्या गोष्टीबद्दल हिने निंदिले म्हणून ही नाश पावली.!'

यावर गौतमाने सांगितले—

'ही नाश पावली तरी पुनःपुन्हा जन्म घेत राहीलच. मात्र हिला यापुढे स्त्री-जन्म नाही!'

बोधिसत्त्व कुठल्याही योनीत जन्म घेतो—फक्त स्त्रीयोनीत जन्म घेत नाही, याचे रहस्य तुम्हाला कळले ना? □

---

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# अफगाणिस्तान दोघांचे भांडण, रशियाचा लाभ

२७ एप्रिलला अफगाणिस्तानमध्ये उठाव झाला आणि अध्यक्ष दाऊदचे सरकार रक्तरंजित सत्तान्तरामध्ये उलथण्यात आले, त्या वेळीच अफगाणिस्तानच्या या अचानक घडलेल्या सत्तान्तरामागे रशियाचा हात असावा असा अंदाज होता. आता अधिकाधिक माहिती जी बाहेर येत आहे त्यावरून या अंदाजाची खात्री होण्यास काहीच हरकत नाही. त्या वेळचे रूढ सरकार जाऊन त्या जागी नूर मोहम्मद तराक्की हा सत्ताधीश झाला.

अफगाणिस्तानात दोन पक्ष या घटनेआधी अस्तित्वात होते. पर्शम आणि खल्क हे ते दोन पक्ष होत. यापैकी पर्शम हा पक्ष प्रथमपासूनच रशियावादी असल्याने या पक्षाला सत्तान्तरानंतर सत्तेचा मलिदा मिळणार असे सुरवातीला वाटले होते; परंतु या ठिकाणी रशियाने हातचे सोडून पळत्यापाठी लागण्याचा मार्ग स्वीकारला. तो बहुवंशी यशस्वीही ठरला आहे. खल्क हा तराकीचा पक्ष डावा असला तरी रशियाधार्जिणा नव्हता. तो बऱ्यापैकी राष्ट्रीय डावा पक्ष होता. सत्तेत बदल घडविल्यानंतर तराकीला अध्यक्ष करण्यात आले. यात रशियाचा हेतू सत्ता अधिक बळकट करावी असा होता. कोणीही सत्तेवर आला तरी तो रशियाच्याच तालावर चालणार हे उघड होते. जे रशियावादीच आहेत ते तसे चालतील यात नवल नाही; पण तराकीसारखा जरा स्वतंत्र वृत्तीच्या व लोकप्रिय नेत्याला अंकित केले म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारण्याच्या सद्हेतूने व व्यावहारिक बुद्धीने रशियाने हे कृत्य केले.

## सत्तान्तर

सत्तान्तरानंतरचे काही आठवडे अत्यंत संघर्षमय अशा पडद्याआडच्या हालचालीत गेले. तराकी सत्तेवर आल्यावर लष्करातल्या त्याच्या वजनावरच त्याचे स्थैर्य अवलंबून रहाणार होते. कारण हा उठाव पूर्णतः लष्कराच्याच मदतीवर पार पाडण्यात आला होता. दाऊद हा आधीचा अध्यक्ष. त्याच्या राजघराण्याची सत्ता संपुष्टात आणून त्याचे कुटुंब त्याच्यासकट सफा करण्यात आले. त्याच्याशी एकनिष्ठ असणाऱ्या दोन डिविजन्स सैन्याने थोडा प्रतिकार केला; पण तो मोडून काढण्यात आला. कादर हा पर्शम या रशियाधार्जिण्या पक्षाचा नेता व त्याचे लष्करातील वजनही मोठे होते. तोच खरा प्रतिस्पर्धी हे तराकीने तेव्हाच ओळखले; पण त्या वेळी त्याच्याविरुद्ध काहीही करणे म्हणजे आपण होऊन खुर्ची घालविणे होय, असे असल्याने तराकी तेव्हा फक्त कादर सत्तेपासून अधिकाधिक दूर कसा राहील

याची काळजी घेत होता. तात्पुरती सोय म्हणून कादरला संरक्षणमंत्री करण्यात आले.

मात्र संरक्षणमंत्रिपदासारख्या महत्त्वाच्या पदावर तराकी टिकू देणे शक्यच नव्हते म्हणून १७ ऑगस्टला त्याला कटाच्या आरोपावरून अटक करण्यात आली. त्या-आधीच आधीच्या पर्शम पक्षाचे आणि रशियाधार्जिणे असे प्रमुख नेते देशाबाहेर राजदूत म्हणून हाकलण्यात आले. त्यातले काही असे ( १ ) कर्नल बबरक हा क्रमांक दोनचा माणूस. अत्यंत कडवा रशियावादी. त्याला चेकोस्लोव्हाकियाला राजदूत म्हणून पाठविण्यात आले. ( २ ) डॉ. अनालिता ही एकमेव स्त्रीनेती युगोस्लाव्हियात राजदूत म्हणून गेली. ( ३ ) अब्दुल वकील हा परराष्ट्रखात्यातला महत्त्वाचा व वजनदार माणूस लंडनला गेला आणि ( ४ ) नूर अहमद नूर हा गृहमंत्री आणि जनमानसात आदरणीय ठरलेला पुढारी वॉशिंग्टनला रवाना करण्यात आला. अशा रीतीने एका-मागून एक प्रमुख सुप्त स्पर्धक आणि विरोधक आपल्या वाटेतून काटयासारखे काढून टाकण्यात तराकी आजवर तरी यशस्वी झालेला दिसतो.

परंतु ही परिस्थिती टिकेल की नाही याची शंका आहे. कारण कादर सैन्यात प्रिय आहे. सैन्याची विभागणी काय संतुलन राखते यावर आणि रशिया कोणामागे आपली ताकद उभी करतो यावर भवितव्य अवलंबून आहे. केवळ लष्करातूनच तराकीला विरोध होईल असे नाही. अफगाणिस्तान हा प्रामुख्याने मुस्लिम व तोही कट्टर पुराणमतवादी मुस्लिम देश आहे. डाव्या शक्तींचा उदय हा धर्मश्रद्धांना झेपणारा नाही. मुल्ला म्हणजे धर्मगुरू ही एक ग्रामीण अफगाणिस्तानातील प्रमुख शक्ती आहे. ती डावलून चालणार नाही. कुनर, पख्तयार या प्रांतांत आताच ग्रामीण जनतेच्या विरोधाची झलक दिसू लागलेली आहे. ती लष्कराच्या जोरावर दडपण्यात आली आहे; पण जर हा विरोध पसरला, तर तो काबूत राखणे हे आधीच अस्थिर असणाऱ्या राजवटीला फारच जड जाईल. बबरकला सत्तेवर न येऊ देण्यात रशियाचा हाही एक हेतू होताच. तो कट्टर डावा असल्याने त्याला नवे सरकार मार्क्सिस्ट लेनिनिस्ट हवे होते. इतकेच नाही, तर आपण मार्क्सिस्ट लेनिनिस्ट आहोत हे अधिकृतरीत्या जाहीरही करायला हवे होते. त्याने ही परिस्थिती अधिकच चिघळली असती. तराकी त्या मानाने सौम्य इसम आहे. मुल्लावर्ग बबरकच्या जेवढा विरुद्ध आहे, तेवढा तराकीच्या विरुद्ध नाही. यासाठी तराकीलाच आणखी काही काळ तरी सत्तेवर ठेवणे रशियाला सोयीचे आहे.

अफगाणिस्तानात सामान्य माणसाचे जीवन सुरळीत चालू आहे. मात्र लष्कर जागोजागी तळ ठोकून आहे. काबूलमध्ये मधून मधून कर्फ्यू जारी असतो. अचानक रणगाडयांच्या, विमानांच्या हालचालीही चालू होतात. एखादा लष्करी अधिकारी बंड करू लागल्यास त्याला मिटविण्यासाठी ह्या हालचाली होत असाव्यात.

### रशियाची पोलादी पकड

रशियाने मात्र सरकारवर व शासन-संस्थेवर पूर्ण ताबा मिळविला आहे. साडे-चार हजार रशियन 'सल्लागार' सध्या अफगाणिस्तानात आहेत. संपूर्ण सत्ता यांच्या हातात एकवटली आहे. अंतर्गत यादवीत गुंतलेला राजकारण्यांचा वर्ग देशातील महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याच्या फंदात पडतच नाही हे त्यांच्या पथ्यावरच आहे. आजवर रशियाने पकड बसविलेले देश कमी नाहीत; पण केवळ चार महिन्यांतच अफगाणिस्तान-वर जी पकड ज्या घट्टपणे बसविली आहे, तिला तोड नाही.

अफगाणिस्तानच्या सीमेलगत चीन आहे म्हणूनच अफगाणिस्तानवर कबजा मिळविणे रशियाला फारच महत्त्वाचे आहे पाकिस्तान आणि इराणच्याही जवळ रशिया त्यामुळे सरकला आहे. इराणमध्ये आधीच राजकीय अस्थैर्य आहे, त्यात अफगाणिस्तान रशियाच्या घशात जाणे अमेरिकावादी इराणला दहशत वाटायला पुरेसे आहे.

पाकिस्तानचा पख्तुनिस्तान हा भाग आधीच अस्वस्थ असतो. आता पाकिस्तानच्या सरळ सीमांवरच लाल रशिया येऊन ठेपल्याने हे पाकिस्तानचे अंतर्गत असंतोष धुमसत रहातील व स्फोट करतील हे अशक्य नाही.

आणि पाकिस्तानच्या शेजारी आपला अलिप्त राष्ट्रचळवळ नावाच्या थंड चळवळीचा अध्वर्यु भारतच येतो ! ☐

## वर्गणीदारांसाठी

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी २०।१०।७८ पूर्वी २–७५ रुपये पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी, तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.

ज्यांची वर्गणी १५ ऑक्टोबरपूर्वी संपत असेल त्यांनी वर्गणी लगेच रवाना करावी म्हणजे त्यांना दिवाळी अंक रवाना करता येईल.

जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी २०।१०।७८ पूर्वी तसे कळवावे.

**व्यवस्थापक**

# इंदिरा गांधी

## रायबरेली ते चिकमगळूर

वा. दा. रानडे

कर्नाटकातून लोकसभेचीची चिकमगळूर पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी घेतला आणि ६ ऑक्टोबरला दुपारी साडेबाराचा सुमुहूर्त पाहून उमेदवारीचा अर्जही भरला. त्यापूर्वी शृंगेरीमठाला भेट देऊन शंकराचार्यांचाही आशीर्वाद त्यांनी मिळविला होता. त्यांच्या समाजवादात हे सारे बसते.

निवडणूक लढविण्याची आपली इच्छा नव्हती; पण पक्षाचा आग्रह मानायला हवा म्हणून निवडणूक लढविण्याचे आपण ठरविले असा आभास इंदिरा गांधींनी निर्माण केलेला आहे; पण तो खरा नाही. सारे काही योजनापूर्वक ठरवून झालेले आहे. चिकमगळूरची सुरक्षित जागा इंदिरा गांधींसाठी रिकामी करून त्यांना तेथून लोकसभेवर निवडून आणावे असे आधीच ठरले होते; जागा रिकामी कशी करावयाची ? पण त्यासाठी तेथून निवडून आलेल्या इंदिरा काँग्रेस-खासदाराची विधानपरिषदेवर निवड करण्यात आली. लोकसभेवर निवडून आलेला खासदार ती जागा सोडून त्यापेक्षा दुय्यम महत्त्वाची अशी विधानपरिषदेची जागा पसंत करील हे स्वाभाविक वाटत नाही. राज्यसभेत आणि विधानपरिषदेत साधारणपणे पराभूत झालेल्या किंवा तिकिटे नाकारलेल्या उमेदवारांची सोय केली जाते.

निवडणुकीत एका जागेवर निवडून यावयाचे आणि नंतर पराभूत ज्येष्ठ नेत्यासाठी ती खाली करावयाची हा पायंडाच योग्य नाही; पण आपल्याकडे पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासूनच तो पडत गेलेला आहे आणि त्यात काही वावगे असल्याची टाकाही कोणी केलेली नाही. व्यक्तिमहात्म्य आणि व्यक्तिपूजा अशा अनिष्ट प्रथांतूनच पोसली जाते. तिला पहिल्या निवडणुकीपासूनच आळा घालायला हवा होता. बलसाडला मोरारजीभाईंचा पराभव झाला तेव्हा ते दुसऱ्या सुरक्षित मतदारसंघातून निवडून आले. कृष्णमेनन यांचा उत्तर मुंबईत पराभव झाल्यानंतर पश्चिम बंगालमधल्या एका मतदारसंघातून ते निवडून आले. अशी आणखी काही उदाहरणेही देता येतील.

ज्येष्ठ नेते सबंध देशाचे प्रतिनिधी असतात. कोणत्याही मतदारसंघातून ते उभे राहिले म्हणून बिघडले कोठे असा युक्तिवाद या संबंधात केला जातो. अशा नेत्यांनी कोठेही उभे रहायला हरकत नाही; पण पराभूत झाल्यानंतर एखाद्या खासदाराला जागा खाली करायला लावून त्यांनी निवडून येणे योग्य नाही. एखाद्या आमदार–खासदाराच्या निधनामुळे किंवा त्याची निवडणूक रद्द ठरल्याने पोटनिवडणूक होणार असेल तर त्या जागी अशा नेत्याने उभे रहायला हरकत नाही; पण ज्या मतदारसंघात त्याचा पराभव झाला त्याच मतदारसंघात पुन: निवडणूक लढवून त्याने निवडून येणे अधिक चांगले. त्यासाठी पाच वर्षे थांबावे लागले तरी थांबण्याची तयारी हवी. या काळात विधायक कार्य करून, आपल्या मतदारांचा विश्वास त्याने संपादन करावा. श्रीमती इंदिरा गांधींनी राजनारायण यांना राजिनाम्याचे आव्हान देऊन रायबरेलीतून पुन: निवडणूक लढविणेच अधिक योग्य झाले असते. त्या खालोखाल दुसरा मार्ग म्हणजे उत्तर प्रदेशातच दुसरी एखादी पोटनिवडणूक त्यांनी लढविणे. तशी संधी त्यांना नव्हती अशीही परिस्थिती नाही. या वर्षअखेरपर्यंत फत्तेपूर जागेची पोटनिवडणूक व्हावयाची आहे. ती जागा त्यांना लढविता आली असती.

इंदिरा गांधींनी याच वेळी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला यामागे दोन आडाखे असले पाहिजेत असे दिसते. एक आडाखा म्हणजे शहा आयोगानुसार त्यांच्यावर होणाऱ्या खटल्याचा. असा खटला भरला जाऊन शिक्षा झाली तर त्यांना निवडणूक लढविणे कठीण झाले असते. तेव्हा असा खटला भरला जाण्यापूर्वीच लोकसभेवर निवडून यावे असा विचार त्यांनी केलेला दिसतो. दुसरा आडाखा मुदतपूर्व निवडणुकीचा. जनतापक्षात फूट पडल. लोकसभेतील त्याचे हुकमी बहुमत जाईल. त्याच वेळी सर्व जुन्या–नव्या काँग्रेसवाल्यांनी एकत्र येऊन पूर्वीसारखा संयुक्त काँग्रेस पक्ष स्थापन केला तर त्याच्या हाती सत्ता येऊन आपण पुन: पंतप्रधान होऊ शकू असा त्यांचा मनसुबा आहे. आपण खासदार झाल्याने स्वर्णसिंग काँग्रेसमधील बरेच खासदार आपल्या बाजूला येऊन मिळतील व तो पक्ष जवळजवळ नामशेष होईल असेही त्यांना वाटते.

या साऱ्या आडाख्यांना वस्तुस्थितीचा कितपत आधार आहे ? जनता पक्षात मतभेद व भांडणे आहेत; पण पक्ष फुटण्यापर्यंत ती ताणली जातील असे वाटत नाही. मोरारजीभाईंचे नेतृत्व बदला अशी मागणी करणाऱ्या गटांना आपण अल्पमतात आहोत. हे नुकत्याच झालेल्या जनता संसदीय पक्षाच्या बैठकीत स्पष्टपणे दिसून आले. जनसंघ गट चरणसिंग व समाजवाद्यांबरोबर नाही. त्याने मोरारजीभाईंच्या नेतृत्वास पाठिंबा दिला. पक्ष फुटला की आपल्या हातची सत्ता जाईल याची जाणीव सर्व घटकपक्षांना झालेली आहे. तेव्हा मतभेद व संघर्ष चालू राहिले तरी पक्ष फुटेल असे वाटत नाही.

जुने–नवे सर्व काँग्रेसवाले एकत्र आणून पूर्वीसारखा काँग्रेसपक्ष उभारता येईल हा आडाखा जनता पक्ष फुटेल या आडाख्यावरच आधारलेला आहे. हा विचार इंदिरा गांधींच्या मनात लोकसभा निवडणुकीतील पराभवापासूनच घोळत आहे. संघटना काँग्रेसने काँग्रेसला मिळावे याबाबत मोरारजीभाईंची भेट घेऊन त्यांनी प्रयत्नही केले होते. संघटना काँग्रेस आता अस्तित्वात नाही. तो पक्ष जनता पक्षात विसर्जित झाला असून पुन: काँग्रेसमध्ये येण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही असे उत्तर मोरारजीभाईंनी त्या वेळी दिले व त्या भूमिकेवर ते ठाम आहेत. स. का. पाटील यांनी संघटना काँग्रेसचे पुनरुज्जीवन केले असले तरी त्यांना फारच थोडा पाठिंबा मिळालेला आहे. जगजीवनबाबूंच्या गटाने पुन: काँग्रेसमध्ये यावे असेही प्रयत्न इंदिरा गांधींनी केले. त्यातही त्यांना यश आले नाही. स्वर्णसिंग काँग्रेसचे आणखी काही लोक मिळण्यापलीकडे इंदिरा गांधींच्या या प्रयत्नांना यश येण्याची शक्यता दिसत नाही.

काँग्रेसमध्ये फूट पाडून स्वत:च्या नेतृत्वाखाली नवा पक्ष काढला हे सत्तेच्या मार्गावर इंदिरा गांधींनी टाकलेले पहिले पाऊल होते. चिकमगळूरची निवडणूक लढविण्याचा निर्णय हे त्याच मार्गावरील दुसरे पाऊल आहे. सुरक्षित मतदार संघ त्यांनी निवडला असल्याने त्यांच्याशी लढत देणे जनता पक्षास कठीण जाणार आहे; पण इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली या देशात पुन: हुकूमशाहीने तोंड वर काढायला नको असेल तर सर्व लोकशाही शक्तींनी एकत्र येऊन निकराचा सामना द्यायलाच हवा. □



" नाशिक जिल्ह्यातील
देवरे या गावी
एका आरोग्यकेंद्रात
मी स्वत च एखाद्या स्त्रीवर
शस्त्रक्रिया करून
या १५ ऑक्टोबरपासून
सुरू होत असलेल्या
कुटुंब नियोजन पंधरवड्याचे
उद्घाटन करणार आहे. . . . . "

–आरोग्यमंत्री डॉ. प्रमिला टोपले

# कुटुंब नियोजन मोहीम : पुनश्च....

मुलाखत : माणूस प्रतिनिधी, मुंबई

डॉ. श्रीमती प्रमिला टोपले या महाराष्ट्राच्या विद्यमान 'आरोग्य आणि कुटुंब-कल्याणमंत्री' आहेत. नागपूर वैद्यकीय महाविद्यालयातून एम. बी. बी. एस. झाल्यानंतर १९५६ पासून त्यांनी अकोला येथे वैद्यकीय व्यवसायाला सुरुवात केली. आयलंड येथील डी. ओ. आर. सी. पी. आणि डब्लिन येथील एल्. एम्. या पदव्यादेखील त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केल्यानंतर प्राप्त केल्या. अकोल्यातील महिला रुग्णालय, मातृसेवा संघ, आयुर्वेद चिकित्सालय इ. संस्थांमध्ये स्त्री-रोग चिकित्सक म्हणून त्यांनी काही काळ कामगिरी बजाविली. काही काळ इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सचिवपदावर त्या होत्या. स्त्री-रोग चिकित्सक संघटनेच्या त्या विद्यमान अध्यक्ष आहेत. सामाजिक कार्याची उपजत आवड असल्याने रेडक्रॉस, महिला परिषद इ. संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध आहेत. १९६७ पासून त्या अकोला नगरपरिषदेच्या सदस्या होत्या.

राष्ट्रसेविका समितीच्या त्या कार्यकर्त्या आहेत. भूतपूर्व भारतीय जनसंघाच्या प्रदेश कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली होती. जनसंघाने आयोजिलेल्या अनेक सत्याग्रहांतून यापूर्वी त्यांनी भाग घेतला. विधानपरिषदेत विदर्भ पदवीधर मतदारसंघातून निवड झाल्यानंतर त्यांनी आमदार म्हणून चोख कामगिरी बजावली. आणीबाणीत त्यांनी १५ महिने तुरुंगवास भोगला. लोकसभा निवडणुकीपासून त्या अकोला जिल्हा जनता पक्षाच्या अध्यक्षा आहेत.

माणूस प्रतिनिधी : आरोग्यमंत्रीपदाची सूत्रे आपण हाती घेऊन आता दीड महिना होऊन गेला. आपण येण्यापूर्वी कुटुंब नियोजनाबद्दलची सरकारी परिस्थिती कशी होती ? आपण आल्यानंतर लगेचच काही आवश्यक बदल आपल्याला करावेसे वाटले का ?

आरोग्यमंत्री : आणीबाणीत कुटुंब नियोजनाची मोहीम घिसाडघाईने राबविण्यात आली. त्याचा परिणाम त्यानंतरच्या सरकारी धोरणावर निश्चितपणे झाला, पण नंतर म्हणजे विधानसभा-निवडणुकीनंतर वसंतदादांच्या सरकारने कोणतेही धोरण घोषित केले नव्हते. त्यामुळे कुटुंब नियोजनासारख्या महत्त्वाच्या विषयाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. त्यातही एक समाधानाची गोष्ट म्हणजे तुलनेने या बाबतीत जागृत झालेल्या महिलांचे वाढते प्रमाण ! अलीकडेच मी विदर्भात गेले होते तेव्हा तिथल्या एका खेड्यात प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोणतीही प्रचारमोहीम वगैरे सुरू नसतानासुद्धा त्या दिवशी त्या

केंद्रावर कुटुंब नियोजनाच्या पाच-सहा शस्त्रक्रिया झाल्याचे मला आढळले खेड्यातल्या महिला जर या रीतीने जागृत होणार असतील तर कोणत्याही प्रचाराचा ढोल न वाजविता कुटुंब नियोजनाचं लक्ष्य सहजपणे गाठता येईल.

मी आरोग्यमंत्री झाल्यानंतर या कार्यक्रमाकडे अधिक लक्ष पुरविण्याचं आमच्या सरकारचे धोरण आहे. अर्थात कोणतीही आणि कशाही प्रकारची सक्ती करण्याचा आमचा विचार नाही. गेल्या महिन्यातच, कुटुंब नियोजनाला चालना देण्याच्या दृष्टीने नागपूरला आम्ही कुटुंबनियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांची एक परिषद बोलाविली होती. या परिषदेत या मोहिमेतील सर्व समस्यांचा विचार झाला. काही अधिकाऱ्यांनी तयार केलेले पेपर्स वाचून दाखविण्यात आले. केंद्र सरकारनेही अलीकडे काही खंबीर पावले उचलली आहेत. केंद्राने ठरवून दिलेले ४.४५ लक्ष शस्त्रक्रियांचे लक्ष्य आम्ही या वर्षी गाठणार आहोत. मात्र राज्याच्या कुटुंब नियोजन मोहिमेत शस्त्रक्रियांची संख्या वाढविण्याइतकेच शस्त्रक्रिया जास्तीत जास्त निर्दोष कशा होतील याकडे लक्ष द्यावे, असे माझ्या मंत्रालयाचे धोरण आहे.

प्रश्न : आत्ता आपण नागपूरच्या ज्या परिषदेचा उल्लेख केला त्या परिषदेत कुटुंब नियोजन मोहिमेबद्दल झालेल्या चर्चेचं स्वरूप काय होते ? आणीबाणीकालीन चुका टाळण्याच्या दृष्टीने काही उपाय, सूचना वगैरे...

उत्तर : कुटुंब नियोजन मोहिमेवर खरं सांगायचं तर अगदी इत्थंभूत चर्चा झाली. शस्त्रक्रियेची साधने आणि त्यांची निगा, कुटुंब नियोजन शिबिरातली गैरव्यवस्था इ. बारीक-सारीक गोष्टींवरही व्यवस्थित विचारविनिमय झाला. मी याच परिषदेत एक गोष्ट स्पष्ट केली की, स्वेच्छेने येणाऱ्या कोणाही स्त्री-पुरुषावर शस्त्रक्रिया करण्यास डॉक्टरांनी घाबरण्याचे कारण नाही. पोलिसी कारवाई वगैरेंचे भय बाळगण्याची आवश्यकता नाही. कारण कोणीही कुणावर सक्ती करीत नाहीए.

नागपूरच्या या परिषदेचा १४ ऑक्टोबरपासून राज्यात होणाऱ्या कुटुंब नियोजन पंधरवड्याला निश्चितच फायदा होईल.

प्रश्न : या पंधरवड्यात पूर्वीपेक्षा वेगळ्या प्रकारे काही घडण्याची शक्यता किती ? विशेषतः 'प्रमोटर' लोकांमुळे होणाऱ्या चुका टाळण्यासाठी काही योजना वगैरे आहे काय ?

उत्तर : पूर्वीपेक्षा वेगळे असे या पंधरवड्याचे स्वरूप राहील हे नक्की. कारण एक तर शस्त्रक्रिया करणारे आता अधिक काळजीपूर्वक काम करतील. शिवाय योजना निर्दोष स्वरूपात राबविण्यासाठी आणखी काय करता येईल, याचाही विचार सुरू आहे. प्रमोटर्समुळे ही योजना मुख्यतः बदनाम झाली. त्यामुळे ह्या लोकांना काढून टाकता येईल काय, याचाही आम्ही विचार करीत आहोत. अर्थात वाटते तेवढी ही गोष्ट सोपी नाही. प्रमोटर्सना काढून टाकले तर अधिकाधिक लोकांनी शस्त्रक्रिया करवून घ्याव्यात म्हणून आकर्षणे वाढवावी लागतील. कुटुंब नियोजनासाठी महिलांचा विरोध मोठ्या प्रमाणावर असतो. आपली दोन-तीन कच्चीबच्ची जगली-वाचली नाहीत तर आधार कोणता, हा विचार त्यांना अनेकदा अस्वस्थ करतो. खेड्यातली रोगराई आणि दैन्य पहाता या ग्रामीण महिलांना असे वाटले तर दोष त्यांचा नाही; पण यावर उपाय काय ? मी आमदार म्हणून निवडून आले, त्याच्याही पूर्वीपासून हा प्रश्न मला भेडसावीत होता. माझ्या मते ग्रामीण महिलेची ही भीती काढून टाकायची असेल तर तिला काही तरी आर्थिक आधार सरकारने दिला पाहिजे. त्यामुळे दुर्दैवाने शस्त्रक्रिया झालेल्या महिलेची मुले दगावलीच, तर तिला आर्थिक चिंता रहाणार नाही. असा आर्थिक आधार देण्यासाठी, शस्त्रक्रिया केल्यानंतर दोन किंवा पाच वर्षे, सरकारला परवडेल त्याप्रमाणे, दरमहा ५० रु. पेन्शन त्या महिलेला देण्यात यावे. शस्त्रक्रिया पुरुषाने करून घेतली तरीदेखील पेन्शन हे स्त्रीला मिळालेच पाहिजे. अर्थात या सर्व योजनेवर अजून सरकारीरीत्या विचार व्हायचा आहे. सरकारला ती अमलात आणता आली तर कुटुंब नियोजन मोहिमेला खात्रीने गती मिळेल, असा माझा विश्वास आहे.

प्रश्न : कुटुंब नियोजनाचा हा महाराष्ट्रातील पंधरवडा सुरू होण्यापूर्वीच प्रौढ शिक्षण योजना सुरू होणार आहे. या योजनेशी कुटुंब नियोजनाची सांगड घातली जाणार आहे काय ? प्रौढांमध्ये या विषयाचा प्रचार व्हावा, यासाठी आपण आणखी काय सुचवू शकाल ?

उत्तर : केंद्र सरकारने प्रौढ शिक्षणाची ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे ही योजना प्रौढांसाठी आहे त्यामुळे कुटुंब नियोजनाच्या दृष्टीने त्याचा जरूर फायदा घेतला जाईल. या योजनेचा मी तपशीलवार अभ्यास केला आहे. या योजनेमुळे कुटुंब नियोजनासाठी Paid Educaters मिळू शकतील हे महत्त्वाचे. कारण अखेर हा विषय शिकवून, समजावून गळी उतरविण्याचा आहे. इथे सक्ती उपयोगाची नाही. या योजनेत महिला कार्यकर्त्याही भाग घेतील व या महिलांनी ग्रामीण अशिक्षित महिलांना कुटुंब नियोजन समजावून सांगावे, याकडे राज्यसरकार विशेष लक्ष देईल.

शिवाय दृक्-श्राव्य साधनांचा जास्तीत जास्त वापर करून शिक्षणातून हा विषय समजावून सांगण्यात येईल. काही विशिष्ट Films तयार केल्या जातील. आरोग्यखात्याबरोबरच इतर सर्व खात्यांनी या कामात सहकार्य दिले पाहिजे. १४ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या या पंधरवड्यात थंड पडलेला, दुर्लक्षित झालेला हा सामाजिक महत्त्वाचा विषय लोकांच्या समोर ठसठशीतपणे यावा, Wave निर्माण व्हावी हा मुख्य उद्देश आहे. या पंधरवड्याची सुरवात मुख्यमंत्र्यांच्या रेडिओवरील भाषणाने होईल. नाशिक जिल्ह्यात देवरे या गावी एका आरोग्यकेंद्रात मी स्वतः एखाद्या स्त्रीवर शस्त्रक्रिया करून या पंधरवड्याचे उद्‌घाटन करणार आहे.

प्रश्न : उद्‌घाटनाची ही पद्धत निश्चितच स्वागतार्ह आहे. आत्ताच आपण कुटुंब नियोजनाचा प्रचार महिलांकडून प्रभावीपणे होऊ शकेल, असे म्हणालात. महिला संघटनांनी, स्वयंसेवी संघटनांनी ही मोहीम उचलावी असे आपल्याला वाटते काय ?

उत्तर : स्वयंसेवी संघटना या क्षेत्रात आल्या तर निश्चित खूप फायदा होईल; पण सगळ्याच स्वयंसेवी संघटना कार्यक्षम नसतात.

इंडियन मेडिकल असो. ला मोहिमा उघडून शिबिरे घ्यायला काय हरकत आहे ? मी सचिव होते तेव्हा खूप प्रयत्न केले; पण ही मंडळी सहजासहजी तयार होत नाहीत.

महिला संघटनांनी मात्र या क्षेत्रात जरूर उतरायला हवे. राष्ट्र-सेविका समिती असे काही करील की नाही, मला शंका वाटते; पण अशा संघटना आल्या तर त्यांचा खूप उपयोग होईल. आम्ही आता एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. आता अनेक सेवाभावी डॉक्टर्स नेत्रयज्ञ, मोफत तपासणी अशा कारणांसाठी खेड्यांमध्ये जातात. ह्यातले जे शल्य विशारद असतील त्यांना आम्ही त्यांच्या मूळच्या कार्यक्रमाबरोबरच कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्याचीही सूचना केली आहे सरकार यासाठी सर्व मदत देणार आहे. बघू या, याचा कितपत उपयोग होतो ते !

प्रश्न : काही राज्यांतून कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेल्यांनाच बढती द्यावी, किंवा नोकरी देताना वय, जात, कार्यक्षमता याबरोबर अपत्यांची संख्या हाही एक निष्कर्ष लावण्याबाबत विचार सुरू आहे. असे उपाय कितपत उपयुक्त ठरतील ?

उत्तर : माझा कोणत्याही प्रकारच्या सक्तीला तीव्र विरोध आहे आणि तुम्ही सांगत आहात तशी उपाययोजना हेसुद्धा सक्तीचेच एक सौम्य स्वरूप आहे. याचा अर्थ हे उपाय टाकाऊ आहेत असा नाही. निश्चित तपशील मिळाला तर त्यांचाही जरूर विचार करता येईल; पण खरं म्हणजे, कुटुंब नियोजनासाठी अधिकाधिक Mobilization ची गरज आहे. लोकांवर प्रभाव टाकू शकतील अशी सर्व माध्यमे, अशा सर्व व्यक्ती यासाठी उभ्या राहिल्या पाहिजेत. नियम करून हे होणार नाही; कारण नियम व कायदा झाला की, त्यातून पळवाटा शोधण्याकडेच लोकांचे लक्ष असते.

शिवाय कुटुंब नियोजनाबद्दलचा अपप्रचार खोडून काढला पाहिजे. आणीबाणीत आपल्याच राज्यात काही ठिकाणी जखम ओली राहून पुढे धनुर्वात होण्याची प्रकरणे झाली. काहीजण त्यात दगावलेसुद्धा. तर सांगायचा मुद्दा असा की, अशा गफलती होऊ नयेत याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष दिले पाहिजे. अप्रशिक्षित नर्सेसवर हे काम सोपविता कामा नये. कारण अशा घटनांची बातमी स्वामाविकच लवकर पसरते आणि लोकांवर त्याचा वाईट परिणाम होतो. या गफलती टाळण्यासाठी मी शक्य ते सर्व उपाय योजणार आहे. एक वेळ शस्त्रक्रियांमध्ये संख्यात्मक वाढ किंचित कमी झाली तरी चालेल; पण गुणात्मकता कमी होता कामा नये. कारण एकदा का गफलत झाली की, प्रतिकूल परिणाम फार होतो.

प्रश्न : केंद्र सरकारचे कुटुंब नियोजनाबद्दलचे धोरण आपल्याला कसे वाटते ? त्यात काही बदल आवश्यक आहेत काय ?

उत्तर : सध्या तरी हे धोरण चांगले आहे. पंतप्रधान स्वतः आरोग्यमंत्रालयात लक्ष घालीत आहेत. कुटुंब नियोजन रेंगाळू नये असा त्यांचा आग्रह आहे. या विषयाला चालना देण्यासाठी म्हणून ६, ७, ८ ऑक्टोबरला भोपाळ येथे सर्व राज्यांच्या कुटुंबकल्याण-मंत्र्यांची बैठक बोलाविण्यात आली आहे. माझ्या मते या विषयाला उजळा देण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची आहे.

प्रश्न : आता एक शेवटचाच प्रश्न. नवा झटपट वैद्यकीय अभ्यास-क्रम राज्य सरकार सुरू करणार आहे असे आपण म्हणाला होता. या अभ्यासक्रमाविषयी काही सांगू शकाल काय ?

उत्तर : सध्याचा अभ्यासक्रम खूप वर्षांचा आहे. शिवाय स्पर्धेच्या वाढत्या प्रमाणामुळे अनेक हुशार विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात येऊ शकत नाहीत. नव्या लघुअभ्यासक्रमात बाकी भाग पूर्वीसारखाच राहील. मात्र शवच्छेदन हा वेळखाऊ भाग काढण्यात येईल. त्याऐवजी प्रतिकृतीवरून शरीरशास्त्र शिकविले जाईल. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा राहील आणि मुख्य म्हणजे ही महाविद्यालये सिव्हिल हॉस्पिटलशी किंवा तालुक्यातील कॉटेज हॉस्पिटलशी संलग्न राहतील. यामुळे चांगल्या विद्यार्थ्यांना संधी मिळेल व खेड्यात डॉक्टर्स जात नाहीत हाही प्रश्न काही प्रमाणात सुटेल. योग्य पूर्वतयारी झाली तर जानेवारीपासूनच हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार आहे.

❊


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये


**फिडेल, चे आणि क्रांती**

लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

## जोशी – अभ्यंकर हत्याकांड



# एका वार्ताहराची दैनंदिनी

## भाग तिसरा । वरुण भिडे

३१ जुलै १९७८ : ५८ वा दिवस

पोलीस आणि आरोपींच्या वकिलांची आज झटापट सुरू झाली. मुख्य तपासणी-अंमलदारांच्या साक्षींना सुरुवात झाली. अनिल गोखलेच्या खुनाचा तपास करताना हा प्रकार जोशी–अभ्यंकर हत्याकांडासारखाच आहे, हे ओळखणारे आणि पुढे जक्कलशी संबंधित पुरावे काढणारे इन्स्पेक्टर माणिकराव दमामे साक्षीला आले होते. काही मंडळींना प्रकरणेच चांगली मिळतात. पूर्वी 'खोपडी' प्रकरणात दमामे गाजले होते.

'गाठी पहाताच या खुनाचे जोशी-अभ्यंकर–बाफना वा प्रकारांशी साम्य असल्याचे जाणवले', हे वाक्य वगळता बाकी सर्व माहिती पंच आणि माल हजर करणाऱ्या व्यक्तींच्या साक्षीत आली होती. त्यामुळे सरतपासणी तशी कंटाळवाणीच होती.

उलटतपासणीत मात्र मजा आली. डिफेन्सची स्टोरी काय असणार याचा अंदाज आला. २५ मार्चला अनिलचे प्रेत सापडले. आरोपीबरोबर अनिल बाहेर पडल्याची माहिती त्याच दिवशी मिळाली. 'आरोपींना अटक ३० मार्चच्या पहाटे झाली. याचा अर्थ आरोपी २५ मार्चपासून पोलिसांच्या ताब्यात होते. २५ मार्च ते ३० मार्च या काळात पोलिसांनी बनावट पुरावा तयार केला आणि ३० मार्चला अटक दाखविली', अशी एकूण डिफेन्स–स्टोरी दिसते.

पोलिस अधिकारीही महाबनेल असतात. काही काही उत्तरे अशी झकास दिलीत, 'मुनावर शाच्या फोटोमागे अल्बममधून काढल्याच्या खुणा दिसतात ना?' हा नागूअण्णांचा प्रश्न, 'काळे दिसते' म्हणून दमामेंनी उडविला. 'अहो, तुम्ही पोलिस-इन्स्पेक्टर आहात, अल्बमचा कागद ओळखता येत नाही?' या प्रश्नाला 'मी पोलिस-इन्स्पेक्टर आहे. कागदाचा तज्ज्ञ नाही!' असा टोला हाणला.

एकंदर प्रश्नोत्तरे झकासच झाली.

१ ऑगस्ट १९७८ : ५९ वा दिवस

आज खानविलकरांची साक्ष झाली. मुनावर शाकडून जप्त केलेल्या अभ्यंकरांकडील मोत्यांच्या बांगड्या, 'चांदीच्या आहेत आणि सोन्याचे पाणी दिलेले आहे', हे कशावरून ओळखलेत, असा नागूअण्णांनी प्रश्न केला. त्याचा इन्स्पेक्टर खानविलकरांना खुलासा करता आला नाही. खरे म्हणजे हिराबाई अभ्यंकरांनी 'मोत्याच्या बांगड्या नेहेमी चांदीच्याच असतात, त्याला सोन्याचे पाणी दिलेले असते', हे उत्तर दिले होते. तेच उत्तर इथे देता आले असते. एम. वाय. सावंतांची (सहाय्यक पोलिस आयुक्त) सरतपासणी संपली. दमामेंच्याच साक्षीची पुनरावृत्ती.

संध्याकाळी मित्राकडे गेलो होतो. त्याची बायको म्हणाली, 'हे वकील हलकट–नालायक आहेत. यांनी आरोपींचे वकीलपत्र घ्यायला नको होते. धंदा झाला म्हणून काय झाले? पैशासाठी वाटेल

ते करायचे का? त्यांना पैसेच हवे असतील तर मी पुढाकार घेऊन वर्गणी गोळा करते. वकिलांना मिळाले असतील त्याच्या दुप्पट पैसे मिळवून देईन!' वगैरे वगैरे.

मी हल्ली अशा मंडळींशी वाद घालणे सोडून दिले आहे. कारण एकदा आरोपीला अटक झाली की तो गुन्हेगार आहे, हे समाज गृहीत धरतो. नव्व्याण्णव टक्के व वेळा ते खरेच असते; पण एकदा, 'दहा गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एक निरपराध फाशी जाता कामा नये', हे सूत्र तुम्ही मान्य केले म्हणजे आरोपीला बचावाची रूढ संधी दिलीच पाहिजे. दुसरे असे की, जक्कल-सुतार आणि मंडळींना अटक झाली, प्रचंड पुरावा आला म्हणून गुन्हेगार आहेत, असे गृहीत धरावयाचे का? आता माझी स्वतःची या प्रकरणात खात्री आहे की, पोलिसांची कहाणी खरी आहे; पण समजा, हे लोक मिळाले नसते आणि सुरेंद्रपालसिंग, रॉबर्टस् वगैरे पूर्वी संशयांवरून पकडलेल्या मंडळींनाच आरोपी म्हणून इथे उभे केले असते, सध्याची डिफेन्स स्टोरी आहे तसा खरोखरच बनावट पुरावा केला असता तरी लोक म्हणाले असते, 'या हरामखोर सुरेंद्रपालसिंग; रॉबर्टस्ना शनिवारवाड्यासमोर फाशी द्या! दगडाने ठेचून मारा!'

पूर्वी जयश्री शहा खून प्रकरणात दोन सरदारजींना असेच आरोपी म्हणून उभे केले होते. बनावट पुरावा असल्याने केस टिकली नाही. पोलीस जीव तोडून सांगतात की, तेच आरोपी होते; पण माझी पक्की खात्री आहे की, ते संपूर्ण प्रकरण बनावट होते.

एका भोंदू साधू विरुद्धच्या प्रकरणात त्याला सक्तमजुरी झाली, तो साधू त्याच लायकीचा होता हे खरे, पण खटला बनावट होता. साधूसुद्धा म्हणाला, 'माझी लायकी फाशी जाण्याची आहे. पण ही शिक्षा काही कायद्याने झालेली नाही.'

या प्रकरणात तरी तसे झाले नसेल असे का समजावे? अभ्यंकरांना दारात दिसलेला शशिकांत पवळे साक्षीदार आहे; पण समजा, तपास लागला नसता तर त्यालाच आरोपी करण्याचा पोलिसांना मोह झालाच असता ना! डिफेन्सतर्फेही त्याच्यावरच नाव घेण्याचा प्रयत्न करतील.

## २ ऑगस्ट १९७८ : ६० वा दिवस

आज इन्स्पेक्टर एस. एस. कदम साक्षीला आले होते. ब्रॅडमन कसे फटके मारीत असेल तशी फटकेबाजी केली. पुण्यातले सर्वात इरसाल, बिलंदर पोलिस-अधिकारी आहेत. या खटल्याची मुख्य उभारणी हे निश्चित कदमांचेच डोके आहे. इतर माळमसाला, पुरावे शोधण्यात बरेच लोक आहेत; पण खटला ज्या रीतीने मांडला गेला आहे ते डोके 'कदम संप्रदायाचेच'!

प्रत्येक गुन्हेगाराची गुन्हे करण्याची एक ठराविक 'मोडस् ऑपरंडी' असते. त्यावरून गुन्हेगार शोधता येतो. प्रत्येक वकिलाची आणि पोलीस अधिकाऱ्यांचीही 'मोडस् ऑपरंडी' असते. या प्रकरणाच्या मांडणीवरून त्यात कदमांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे त्यांना ओळखू शकणारे लोक सहज सांगू शकतील. 'दहा निरपराध अडकले तरी चालतील; पण एक गुन्हेगार सुटता कामा नये'. अशी त्यांची भूमिका असल्याचे गंमतीने म्हणतात.

उलटतपासणीत त्यांनी एकाही प्रश्नाचे सरळ उत्तर दिले नाही. प्रत्येक प्रश्नामागे काय हेतू आहे, हे ओळखून अशी मस्त उत्तरे दिलीत!

'तुम्ही फर्स्ट क्लास मिळवून एल.एल. बी. झालात ना?'

'एल. एल. बी. झालो.'

'सगळे आयुष्य पोलिस-खात्यात गेले ना?'

'सगळे आयुष्य नाही, तीस वर्षे.'

'आयुष्यात तेवढीच नोकरी केलीत ना?'

'तीस वर्षे केली. त्यात सहा महिने राजाराम कॉलेजमध्ये सायकॉलॉजीचा लेक्चरर होतो.'

डिफेन्सचे वकील प्रत्येक पोलिस-अधिकाऱ्याला 'जप्त वस्तू सील केल्यात का?' म्हणून प्रश्न विचारून त्याची दातखीळ बसवीत. कदमांनी 'तशी कायद्यात तरतूद नाही,' म्हणून वकिलाचीच दातखीळ बसवायची वेळ आणली होती.

सुतारच्या घरातून वेगवेगळ्या वस्तू वेगवेगळ्या वेळी जप्त केल्या होत्या. त्या वस्तूंसंबंधात इतकी सावध उत्तरे दिली की, बोलायची सोय नाही.

'घराची झडती गुन्ह्यातील मालाबद्दल झाली ना?'

'ही झडती सदर गुन्ह्यातील मालाबद्दल होती.'

'सदर गुन्ह्यातील माल कुठला?'

'एकूण मल्टिपल मर्डरमधील मला माहिती आहे तेवढाच'.

'म्हणजे अभ्यंकर-प्रकरणातला?'

'हो'.

'त्या वेळी जोशी-बाफना प्रकरणातला माल मिळाला असता तर?'

'मला माहिती असता तर तो माल जप्त केला असता.'

'चोरीस गेलेल्या मालाची यादी पाहिली होती ना?'

'त्यातला काही भाग आठवत होता.'

'जप्त वस्तूंची यादी पाठ केलीत का?'

'नाही. काही गोष्टी लक्षात होत्या.'

'इतर वस्तूंबद्दल संशय आला असता तर?'

'तर त्या जप्त केल्या असत्या.'

वास्तविक वकिलाचे प्रश्न इतके सुरेख होते की, 'गुन्ह्यातल्या वस्तू मला माहिती होत्या', असे उत्तर आले असते तर लगेच वकिलांना 'आधीच्या झडतीत सर्व वस्तू जप्त केलेल्या नाहीत, त्या अर्थी नंतरच्या वस्तू पोलिसांनीच नेऊन ठेवल्या आहेत', असे म्हणायला संधी मिळाली असती.

दुसऱ्या एका ज्यूनिअर वकिलाने त्यांना तीन प्रश्न विचारले. तिन्ही प्रश्न न्यायाधिशानीच फेटाळून लावले. या वेळी कदम असा चेहरा करून त्या वकिलाकडे तुच्छतेने पहात होते की, त्या वकिलाला धरणी पोटात घेईल तर बरे, असे वाटले असेल. इतक्या ज्यूनियर वकिलाने असे धाडसच करायला नको होते.

आरोपीचे नातेवाईक जाताना म्हणाले, 'काय हो, आमच्या घरात झालेल्या झडतीचा काहीच उल्लेख झाला नाही?' मी त्यांना त्यांच्या घरातल्या वस्तूंचा कसा कधी उल्लेख झाला ते सांगितले. नंतर नातेवाईक म्हणाले, 'आमच्या घरातून अभ्यंकरांच्या फक्त तेवढ्याच वस्तू जप्त झाल्या आहेत'. इतक्या उद्‌गारल्या त्यांनी आरो-

पीच्या गुन्ह्याची कबुली दिली. कालपर्यंत हेच गृहस्थ 'आमचा सोन्या किती निरपराध आहे', अशी रेकॉर्ड लावीत. म्हणून मी त्यांना विचारले 'काय हो, इतक्या चांगल्या घरातला मुलगा या भानगडीत कसा सापडला?' ते म्हणाले, 'संगत, वाईट संगत, खरं म्हणजे याला काय कमी होतं? वाटेल तितका पैसा होता. पैशासाठी चोऱ्या करायची आणि खून करायची काय गरज होती?'

माणसे किती सहजासहजी खरे बोलून जातात! मध्यंतरी कर्पेची साक्ष झाली त्या वेळी एक आरोपी म्हणाला, 'अहो, हा माणूस आम्हाला अभ्यंकरांच्या दारात भेटलाच नव्हता. भांडारकर इन्स्टिट्यूटच्या कोपऱ्यावर भेटला होता.' दुसऱ्याच आरोपीचे वकील त्याला म्हणाले, 'कोर्टापुढे तसे काही सांगू नकोस. असे म्हणालास तर साक्षीदार खोटा ठरेल; पण तुम्ही गुन्हा केल्याची कबुली दिल्यासारखे होईल.'

### ३ ऑगस्ट १९७८ : ६१ वा दिवस

हुल्याळकरांच्या साक्षीला आज सुरुवात झाली. संपूर्ण प्रकरणाचा तपास त्यांच्याकडे होता. जोशी-खुनाच्या रात्रीपासून त्यांच्यामागे हे प्रकरण लागले. त्यांच्या आयुष्याची दोन-चार वर्षे कमी झाली असणार!

साक्षीत ते म्हणाले, 'या प्रकरणात संशयावरून चारशे लोक तपासले. आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, वीज-मंडळ अशा सर्व दिशांना तपास करून दोरीच्या गाठीचा काही उलगडा होतो आहे का, हे पाहिले'.

जक्कल वगैरेंना अटक झाल्यानंतर अनेक लोक म्हणाले 'यात पोलिसांचे कौशल्य काय? नशीब म्हणून आरोपी सापडले!' अजूनही अनेकजण असेच म्हणतात; पण असे म्हणणे हा अनुदारपणा आहे. पोलिसांनी एकही संभाव्य दिशा शोधायची ठेवलेली नव्हती. असंभाव्य दिशेला तपास लागला, यातदेखील पोलिसांचे कौतुक आहे. अनिल गोखलेचे प्रेत सापडल्यावर त्याच्यावरून आधीची प्रकरणे शोधणे हा पोलिसांच्या चातुर्याचा भाग आहेच.

गाजलेल्या सर्व खुनसत्रात आरोपी नेहेमीच योगायोगाने सापडतात. इंग्लंड–अमेरिकेतल्या क्राइमस्टोरीजमध्ये हेच असते. समजा मीच या प्रकरणातला खुनी असतो तर पोलिसांना माझा संशय येणे शक्य नव्हते. एखाद्या खुनात हलगर्जीपणा केल्याने सापडलो असतो तर लोक लगेच म्हणाले असते, 'बघा, रोज पोलिसांना भेटणारा आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांमध्ये ऊठ-बस असणारा माणूस खून पाडीत होता तरी पोलिसांना पत्ता लागला नाही!' या प्रकारात पोलिसांना दोष देणे बरोबर नाही.

### ४ ऑगस्ट १९७८ : ६२ वा दिवस

हुल्याळकरांची साक्ष संपली. इतरही बारीक-सारीक साक्षी संपल्या. सगळे पोलीसच होते. सोमवारपासून आरोपींचे जबाब सुरू होणार. खटला कधी संपतो आहे असे झाले आहे. अडीच महिने होऊन गेले. रोज पाच तास कोर्टात आणि नंतर ऑफिसात बसून बसून कंबरदुखी सुरू झाली आहे. खटला संपल्यावर हॉस्पिटलमध्ये जावे लागेल की काय, अशी भीती वाटते आहे.

### ७ ऑगस्ट १९७८ : ६३ वा दिवस

जक्कलचा जबाब सुरू झाला. कोर्टाने चारशेतीस प्रश्न काढले आहेत. शिरस्तेदार भालेराव एक एक प्रश्न वाचतात आणि जक्कल हो–नाही किंवा काय हवे ते उत्तर देतो. प्रत्येक वेळी 'पुराव्यात असे आले आहे की......याबाबत तुम्हाला काही सांगायचे आहे?' ही वाक्ये पुन्हापुन्हा येणार. चार आरोपी, चारशे तीस प्रश्न म्हणजे. त्यातला काही मजकूर सतराशेवीस वेळा ऐकायचा. हाल आहेत हाल! आमचे हाल सोडून द्या; पण शिरस्तेदार भालेराव आणि टायपिस्ट तांबे यांचे काय हाल असतील!

कवटीबद्दलच्या सुपरइंपोजिंगच्या पुराव्याबद्दलचा प्रश्न आला तेव्हा जक्कल म्हणाला, 'मला संधी मिळाली तर कोणत्याही चेहेऱ्यावर मी ही कवटी बसवून दाखवीन!' जक्कलने हे आव्हानच दिले आहे. त्याला तशी संधी देणार की नाही याबद्दल कोणालाच सांगता आले नाही. तशी संधी दिली आणि त्याने दिलेले आव्हान खरे करून दाखविले तर काय धमाल येईल! मध्यंतरी एक अफवा पसरली होती की, 'प्रकाश हेगडे अजून जिवंत आहे. निकालाच्या दिवशी त्याला हजर करणार आहेत.' या अफवेतून जी गंमत अपेक्षित आहे तीच सुपरइंपोजिंगबद्दल येईल. अर्थात आधीची अफवा खरी होणे शक्य नाही. समजा, प्रकाश हेगडे खरोखर जिवंत असला आणि हिंदी सिनेमातल्यासारखी 'अदालतमें' एन्ट्री करून 'मैं जिंदा हूं,' अशी घोषणा केली तरी लगेच सिनेमातील पद्धतीप्रमाणे 'रिहा किया जाय' म्हणून आरोपींना सोडणार नाहीत. उलट तो प्रकाश नाहीच तोतया आहे, असे सिद्ध करण्यासाठी पोलीस जिवाचा आटापीटा करतील.

### ८ ऑगस्ट १९७८ : ६४ वा दिवस

जक्कलचा जबाब आज छापून आला आणि सर्वत्र खळबळ चालू आहे. सगळ्याच प्रश्नांना 'नाही' म्हणून कशी उत्तरे देतो, याचेच लोकांना आश्चर्य वाटले आहे.

जबाब संपल्यावर जक्कलने जे निवेदन केले ते अक्षरशः फँटॅस्टिक होते. सारा पुरावा खोटा, हस्ताक्षराचा पुरावा मला दम भरून मारहाण करून लिहायला लावून तयार केला वगैरे वगैरे.

आश्चर्य म्हणजे 'अभ्यंकर खोटे बोलतात' असे म्हणावयाचे काही त्याला धैर्य झाले नाही. अभ्यंकर खरे बोलत असतील तर वस्तू ओळखल्या हे कसे, याबद्दलचा त्याचा खुलासा विनोदीच होता. 'अभ्यंकरांकडे खून झाल्यानंतर पोलिसांनीच अभ्यंकरांच्या अपरोक्ष काही वस्तू पळविल्या असतील. त्याच वस्तू पुरावा म्हणून आणल्या असतील'. काम संपल्यानंतर मी अभ्यंकरांना म्हणालो 'तुमच्यावर खोटेपणाचा आरोप करण्याची जक्कलची हिंमत झाली नाही.' ते लगेच म्हणाले 'त्याची नसेल झाली, पण त्याच्या वकिलाची हिंमत झाली ना!'

सजेशन म्हणून विचारावा लागणारा प्रश्न विचारताना 'माफ करा. विचारावा लागतो म्हणून हा प्रश्न आहे.' असे म्हणून विचारल्या गेलेल्या प्रश्नामुळेही अभ्यंकर बरेच दुखावले असणार.

त्याच्या प्रेयसीवरचे त्याचे प्रेम खरेखुरे आणि मनाच्या तळापासूनचे असावे. तिने विरुद्ध साक्ष देऊनही 'पोलिसांनी तिचे मत

कलुषित केले आहे', असे तो म्हणतो. कुणाच्या मनाला किती भावनांचे पदर असतील काही सांगता येत नाही.

जबाब संपवून जक्कल परत पिंजऱ्याकडे गेला आणि सुतार जबाबाला यायला लागला त्या वेळी जक्कलने त्याला शेकहँड करून बेस्ट विशेस दिल्या. औट झालेला बॅटस्‌मन परतताना नव्या येणाऱ्या बॅटस्‌मनला विश् करतो तसेच दिसले. काल सुताराने जक्कलशी शेकहँड केला. त्या वेळी परीक्षेला निघालेल्या मित्राला विश करावे तसे दृश्य दिसले होते.

९ ऑगस्ट १९७८ : ६५ वा दिवस

सुतारचा जबाब संपला.

१० ऑगस्ट १९७८ : ६६ वा दिवस

जगतापचा जबाब एका दिवसातच संपला. विजयराव मोहित्यांनी त्याला 'शेकहँड वगैरे करू नको' म्हणून बजावले होते. पावती-पुस्तके छापून घेतल्याचे त्याने कबूल केले आहे. अनिलचा खून झाला त्या रात्री अलका टॉकिजसमोर तिथे वर्गमित्र भेटले, हे कबूल केले. पण 'मी एकटाच होतो', असे म्हणाला. जक्कल-सुतारने 'आम्ही अलका टॉकीजपाशी अनिलला सोडले, हे खरे आहे. जगतापच्या तिघा मित्रांनी पाहिले हे खोटे आहे. जगताप-शा आमच्याबरोबर नव्हते,' असे सांगितले.

अडचणीच्या होणार नाहीत इतक्या फॅक्टस् मान्य करायच्या असे यांचे तंत्र दिसते. 'मी म्हणतो तेवढीच वस्तुस्थिती आहे. साक्षीदार सांगतात ते फुगवून, असे म्हणण्याचा प्रयत्न बूमरँगसारखा चौघांवर उलटेल, एका आरोपीने कबूल केलेल्या गोष्टी दुसऱ्या आरोपीविरुद्ध वापरता येत नाहीत हे खरे असले तरी आरोपींनी बाय पार्टस् कबूल केलेल्या फॅक्टस् साक्षीदारांच्या एकूण सुसंगत स्टोरीत त्या त्या जागी अचूक बसतात. त्यामुळे साक्षीदारांवर पूर्ण विश्वास ठेवला जाईल. जक्कल-जगतापने बनावट पावती-पुस्तक करून घेतले, अनिलला घेऊन चौघे आरोपी लकडी पुलाकडे गेले वगैरे पुरावे मान्य होतील. आरोपींचा बचावाचा डाव जुगारी ठरेल असे मला वाटते.

आरोपींनी स्वतःला वाचवून दुसऱ्याला गोत्यात आणण्याचा पवित्रा घेतला आहे. आज एक वकील एका आरोपीला जाताना म्हणाले 'तू रागावला नाहीस ना ?' आरोपी असा काही खवळला! कडाडलाच. 'लाज नाही वाटत, माझ्या गळ्याला फास लावायचा प्रयत्न करता आणि तोंड वर करून बेशरमपणे विचारायला येता ?'

११ ऑगस्ट १९७८ : ६७ वा दिवस

मुनावर शा चा जबाब संपला. आता दहा दिवस तरी कोर्टाच्या आवारात फिरकायला नको.

पाहुण्याच्या जोड्यांनी विंचू मारणे, म्हणजे काय, याचा आज चांगला अनुभव आला. आज ××× कोर्टात आला होता. उगाच फालतू वडबड करून उपद्रव देत होता. आहे बुद्दूच; पण राजकारणात आपल्याला फार अक्कल आहे असे समजतो. खुर्चीवर बसताना दोन्ही पाय वर घेऊन लोडाला टेकून बसल्यासारखा बसला होता.

कोर्टाचे दगडोबा नाईक ते दृश्य पाहून अस्वस्थ झाले. त्यांनी खुणेने विचारले कोण आहे म्हणून. फालतूच आहे, समजल्यावर पुढे झाले. या नाईकांचा चेहरा व्ही. शांतारामसारखा आहे. भरघोस पांढऱ्याशुभ्र मिशांमुळे फार उग्र दिसतात. 'हाजीर है'च्या सवईमुळे आवाजही कमावलेला. ते म्हणाले, 'अहो, खादीवाले. तुमचं राज्य संपलं. तुमच्या राज्यात चालत असेल. आता नीट वसा'.××× इतका खजिल झाला की, उठून पळालाच! आख्खा हॉल खदखदून हसत होता. ××× ला कुणी तरी झाडावे अशी माझी फार जुनी इच्छा तृप्त व्हायलासुद्धा योग यावे लागतात.

१४ ऑगस्ट १९७८

××× चे पत्र आले आहे. 'तुम्ही फार उत्तम रिपोर्टिंग केले. जबाबदारीने लिहिलेत. इतर वर्तमानपत्रांनी वाटेल तसा भडक मजकूर दिला आहे. त्या भडक मजकुरामुळे आमच्या मनाला वेदना झाल्या आहेत', वगैरे वगैरे.

आमच्याकडे या प्रकरणात काय किंवा एरवी काय जबाबदारीनेच लिहिले जाते. भडकपणा नसतो. या प्रकरणात आम्ही सोडून इतरांनी काय भयानक लिहिले होते! पत्र आल्याने बरे वाटले. दिवसभर स्वतःवरच खूष होतो.

रात्री मुद्दाम ×××× कचेरीत गेलो. त्यांना मला पत्र कसे आले आहे, मी किती व्यवस्थित रिपोर्टिंग करतो, कशी काळजी घेतो, तुमच्याकडे कसे भडक, अतिरंजित छापता वगैरे सांगू लागलो. त्यांचे उपसंपादक हसायला लागले. मी बोलायचे थांबल्यावर म्हणाले 'तू बोल'.

माझी भंकस ऐकून घेतल्यावर त्यांच्यातल्या एकाने पत्रातला मजकूर घडाघडा म्हणून दाखविला आणि म्हणाला, 'याच मजकुराचे पत्र आम्हालाही आले आहे. हे पत्र आल्याने ऑफिसने आमच्या बातमीदाराचा सत्कार केलेला आहे.'

आमच्या ऑफिसात असे सत्कार वगैरे करण्याची प्रथा नाही याचा इतका आनंद झाला की, पुढे जन्मात कोणी कसले कौतुक केले नाही तरी चालेल.

पण या पत्रामुळे मला माणसांच्या वागण्यातल्या छटांचा गोंधळ वाटायला लागला आहे. ×××नी पत्रे लिहिली नसती तरी बिघडले नसते. दोघांना किंवा कदाचित त्यापेक्षा जास्त लोकांना असे पत्र लिहिण्यामागे काय हेतू असेल, हे पुढाऱ्याचे तंत्र त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाशी विसंगत वाटले. एकंदर डोक्याला मुंग्या आणणारा प्रकार आहे.

२१ ऑगस्ट १९७८ : ६८ वा दिवस

शामराव सामंतांचे आर्ग्युमेंट सुरू झाले. शामरावांचा आवाज अतिशय प्रभावी आहे. त्यांचे इंग्रजी वाङ्मयाचे वाचन बरेच दांडगे असले पाहिजे. संपूर्ण प्रॉसिक्युशन स्टोरी मांडली आणि डिफेन्सने जे जे हल्ले केले आहेत त्यावर अक्षरशः तुटून पडले.

२२ ऑगस्ट १९७८ : ६९ वा दिवस

शामरावांचा फोटो आजच्या अंकात छापला होता. आरोपीची आई म्हणाली 'शामराव कसा भुतासारखा दिसतो.' आरोपीच्या

आईच्या भावना मी समजू शकतो. खरे पाहिले तर शामरावांची पर्सनॅलिटी चांगली आहे; पण आरोपींच्या आईला शामराव म्हणजे आपल्या मुलाच्या जिवावर उठलेला नरराक्षस वाटत असेल ! संपूर्ण पुणे शहर शामरावांच्या भाषणावर खूष असेल; पण नातेवाईकांच्या भावना वेगळ्याच असणार.

आईची माया आईचीच. आरोपींपैकी फक्त एकाचेच वडील काही वेळा कोर्टात आले होते. प्रत्येकाची आई मात्र रोज येत असे. शाळेत असताना पाठ केलेली 'पिता जरी विटे, विटो न जननी कुपुत्री विटे' ही ओळ मला खरी वाटत नसे; पण ती ओळ खरी असली पाहिजे.

## २३ ऑगस्ट १९७८ : ७० वा दिवस

गेले तीन दिवस पहातो आहे, शामराव ज्या प्रकारे आर्ग्युमेंट करतात, त्यात तर्कविसंगती आहे. आधी म्हणतात, 'अमूक तमूक खरे बोलतो आहे असे मानू.' नंतर त्या आधारे पुराव्यांचे विवेचन करतात आणि शेवटी म्हणतात 'या सर्व गोष्टींचा विचार करता अमूक तमूकची साक्ष ही खरीच आहे.' हा प्रकार म्हणजे आधी कल्पित पाया घ्यायचा, त्याच्यावर टोलेजंग इमारत दाखवायची आणि ही इमारत आहे याचा अर्थ त्याच्याखाली भक्कम पाया आहे, असे त्यांचे लॉजिक आहे.

## २४ ऑगस्ट १९७८ : ७१ वा दिवस

शामरावांच्या आर्ग्युमेंटचा आज चौथा दिवस. त्यांची मुद्दे मांडण्याची पद्धत फार वाखाणण्याजोगी आहे. जोशी-प्रकरण झाले त्यावेळी घराची काहीही उचकापाचक झालेली नव्हती. दागिने शाबूत होते. गेलेल्या वस्तू इतक्या क्षुल्लक होत्या की, त्यासाठी खून पडले असतील असे वाटतच नव्हते. काही तरी वैरभावना असावी असेच वाटत असे.

या प्रकरणामागे पैसे मिळविणे हाच हेतू होता, हे शामरावांनी ठामपणे सांगितले. मृत्यूपूर्वी अच्युतरावांना छापखाना विक्रीचा हप्ता ३,३०० रुपये, घरभाडे ३५० रुपये मिळाल्याचा पुरावा कोर्टापुढे आणला होता. उदयच्या साक्षीत घरात सहा-सातशे रुपयांची रोकड असे, असा उल्लेख आला आहे. या सर्वांचा उल्लेख करून ही सर्व रक्कम चोरलेली असणार, असा शामरावांनी निष्कर्ष मांडला. हा निष्कर्ष पटण्यासारखा आहे.

आनंद वझेचे आई वडील पुण्यात असताना तो वर्तकाश्रमात पिठलेभात आणि गोरेच्या डब्यातले शिळे अन्न का जेवला, असा प्रश्न विचारून नागूअण्णांनी 'हा साक्षीदार बनावट आहे', असे सुचविण्याचा प्रयत्न केला होता. हाच डाव शामरावांनी इतक्या झकास उलटवला! ते म्हणाले, 'घरची परिस्थिती संपन्न असताना जक्कल घरचे अन्न सोडून गोरेच्या डब्यातले शिळे आणि संगमनेरपासून धूळ खात आलेले अन्न का खात होता ? याचे कारण जक्कल मायेचा भुकेला होता हेच आहे.'

जक्कल मायेचा भुकेला होता, ही गोष्ट तर खरीच आहे. फार जणांपाशी त्याने तसे बोलून दाखविले आहे. बालपणात त्याला फार उपेक्षेने वागविले गेले, असे तो म्हणतो. कॉलेजातल्या आठवणीबद्दल तो म्हणतो, 'आमच्या कॉलेजातल्या ××× या प्राध्यापकांनी मला अतिशय वाईट-वागणूक दिली. डूख धरून असल्यासारखं वागत. माझ्या विरुद्ध काय करता येईल याची ते संधी पहात असत. अनेक वेळा मी वर्गात हजर असूनही माझी हजेरी मांडत नसत. मी नियमित वागणारा असूनही मी अनियमित, उनाड असल्याचे रेकॉर्ड निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे, त्याची मला फार चीड येई.'

जक्कल त्या प्राध्यापकांबद्दल म्हणतो ते खरे असले पाहिजे. कारण त्यांच्या कॉलेजातील प्रत्येक विद्यार्थी त्यांच्याबद्दल वाईटच बोलतो. चौघांना अटक झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली, त्या दिवशी अभिनव कला विद्यालयातील अनेक विद्यार्थी म्हणाले, '××× म्हणाले म्हणून आम्ही खून केले, असे या मुलांनी सांगावे.' हा तळतळाट पाहिला म्हणजे जक्कल म्हणतो ते खरे असेल यात मला शंका वाटत नाही.

शिक्षक मंडळीत दात धरून काटा काढण्याची प्रवृत्ती फार असते. एखाद्या विद्यार्थ्याच्या मागे शिक्षक किंवा प्राध्यापक लागतो त्यावेळी विद्यार्थी असहाय्य असतो या छळणुकीची रिॲक्शन खाजकुयली टाकणे, शाई उडविणे, खुर्चीला टाचणी लावणे, दारावर केराची टोपली ठेवणे इतपत येते. स्कूल बोर्डाच्या प्राथमिक शाळेतील वर्षे आणि कॉमर्स कॉलेजातील वर्षे सोडली तर इतरत्र मलाही हा अनुभव आला आहे.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये असताना आमच्या वर्गाचा एक गुंड मुलगा सेक्रेटरी होता. तो माझ्यासारख्या दोन-तीन खेडवळ मुलांबद्दल सारख्या तक्रारी करायचा. 'काच फोडली, खुर्ची मोडली' वगैरे वगैरे. प्रत्यक्षात त्यानेच हे उद्योग केलेले असायचे. आमचे उपमुख्याध्यापक मो. रा. वाळंबे अशी तक्रार गेली म्हणजे आम्हाला धोपटून काढत. खुलासा केला तर 'तोंड वर करून बोलतोस, निर्लज्ज', म्हणून आणखी थपडा मारीत. निरपराध असताना खावा लागलेला मार माझ्या अजून लक्षात आहे. पुढे व्यायाम करायला लागल्यावर मी त्या गुंड मुलाला धोपटले. मला वाळिंब्यांबद्दल राग वाटत नाही; पण आदरही वाटत नाही. असाच अनुभव इतर शाळांपासून विद्यापीठापर्यंत आला. विद्यापीठातले एक प्राध्यापक मुलांशी अतिशय दुष्टाव्याने वागत.

शिक्षकांचा दुष्टावा भयंकर असतो. त्याची रिॲक्शन भयंकर असते. निरनिराळ्या कारणावरून जक्कल समाजाविरुद्ध ज्या प्रकारे रिॲक्ट झाला त्या प्रकारे मी किंवा माझ्यासारखे अनेक लोक रिॲक्ट झाले नाहीत, हा केवळ योगायोगच. मी कॉमर्स कॉलेजात न जाता अशा प्राध्यापकाच्या तावडीत सापडलो असतो तर असाच झालो असतो. एकंदर समाजात ज्ञानेश्वर होण्याचे अनेक सुप्त गुण समाजाच्या दुर्दैवाने झाकलेले असतात, तसेच जक्कल होण्याचे सुप्त गुण समाजाच्या सुदैवाने सुप्त राहतात.

## २५ ऑगस्ट शुक्रवार : ७२ वा दिवस

आज शामरावांनी अभ्यंकर-प्रकरणात आर्ग्युमेंट केले. अभ्यंकरांनी काही वस्तू आणल्या नाहीत, हे सांगितले. त्यावरून त्यांचा शब्द महत्त्वाचा आहे, हा मुद्दा अचक पकडला.

आरोपीचे वकील काय आर्ग्युमेंट करतील याचा आधीच अंदाज बांधून शामराव संभाव्य मुद्दा आणि त्याला उत्तर अशा प्रकारे बोलत आहेत. बुद्धिबळात राजासमोरचे प्यादे किंवा घोड्यासमोरचे प्यादे चौथ्या घरात नेल्याबरोबर समोरचा माणूस पुढच्या डावांचा अंदाज घेतो, तसाच प्रकार चालला आहे.

शामराव इतके प्रभावी रीतीने बोलतात; पण बापटांच्या चेहऱ्यावरची रेषसुद्धा हलत नाही. एखाद्या पुतळ्यासारखे बसून असतात. चेंबरमध्ये बसलेले असताना त्यांच्या चेहऱ्यावर मिश्किलपणा दिसतो; पण गाऊन घालून बोर्डावर आले की, संगमरवरी पुतळ्यासारखा चेहेरा. मला त्यांचा चेहेरा पाहिला की, काऊंट ऑफ माँटे क्रिस्टो या कादंबरीत मॅजिस्ट्रेट व्हिलेफोर्टचे जे वर्णन आहे, विशेषकरून पॅरिसचे मुख्य मॅजिस्ट्रेट म्हणून बेनेडिट्टो प्रकरणाचे वेळी काम करतानाचे 'मूर्तिमंत कायदा' वगैरे वर्णन आठवते. कुठे तरी तसे वर्णन करावे असे वाटते; पण व्हिलेफोर्ट ही कॅरॅक्टर न्यायाधिशाच्या गंभीर चेहऱ्याआड दडलेल्या स्वार्थी घातकी माणसाची आहे. त्यामुळे बापटांच्या चेहऱ्याला ती उपमा देणे हा त्यांचा अपमान होईल आणि निष्कारण कोर्टाच्या लफड्यात सापडावे लागेल; पण कुठे तरी लिहावेसे वाटते. डायरी ही सुरक्षित जागा आहे. कोणी वाचणार नाही. नाही तर मी वर्णन छापणार एका बाजूने आणि अर्थ भलतेच काढले जायचे !

२८ ऑगस्ट १९७८ : ७३ वा दिवस

आजही शामरावांचे आर्ग्युमेंट चालू होतेच. फार झोप येत होती. कालची सुट्टी बुडाली. शरद पवारांचा दौरा होता. काल सकाळी निघावे लागल्याने काल पहाटे उठावे लागले आणि आज पहाटे तीन वाजता परत आल्याने दोन दिवस झोप अर्धी झाली, जीपच्या प्रवासाने अंग ठणकते आहे.

शामरावांनी गोखले-प्रकरणात चांगला मुद्दा मांडला. या आरोपींचा बेत सर्व गोखले कुटुंब खलास करण्याचा असला पाहिजे. कुत्र्याच्या भुंकण्यामुळे डाव फसला, हा मुद्दा पटण्यासारखा आहे. नाही तर अनिल गोखलेच्या खुनाचा हेतू काय, हे समजतच नव्हते. एकूण लोकमत असे की, त्यांना जयंताला मारायचे होते; पण ते जमले नाही म्हणून अनिलला मारले. हा मुद्दा चहा पिता पिता गप्पा मारायला ठीक आहे; पण पटत नाही. शामरावांचा मुद्दा जास्त लॉजिकल वाटतो. काम संपल्यावर घरी जाऊन झोपावे असा बेत होता; पण घरी गेल्यावर नाना ( माझे वडील ) म्हणाले, 'सुषमाच्या नवऱ्याला ( माझे धाकटे साडू शरश्चंद्र भट ) स्कूटर-अपघात झाला आहे. के. ई. एम. मध्ये आहेत.' म्हणून हॉस्पिटलमध्ये गेलो. भट अजून बेशुद्धच आहेत; पण स्कल फॅक्चर वगैरे नाही. सुधारणा होईल असे वाटते.

२९ ऑगस्ट १९७८ : ७४ वा दिवस

शामरावांचे मॅरेथॉन आर्ग्युमेंट संपले. जनरल कॉन्स्पिरसीवर बोलले. बोलता बोलता म्हणाले, 'अभ्यंकरांच्या घरातला बिस्किटाचा पुडा फोडला होता, लोणी खाल्ले होते. बिस्किटे खाता खाता खून करीत होते.' या ठिकाणी त्यांनी 'मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणे' हा वाक्प्रचार वापरायला हवा होता. वाक्य लो टेस्टचे झाले असते; पण प्रभावी झाले असते. (अपूर्ण)


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. मं. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,

१०२५-सदाशिव पेठ, पुणे ३०.

रंगभूमी

# यक्षगान

## तेव्हा भूतकाळ वर्तमान बनतो...

सदानंद बोरसे

मृदंगाचा वाढत्या लयीचा ताल आणि त्याच्या बरोबरीने तंतुवाद्याचा झंकार मोकळा रंगमंच भारून टाकीत आहे. त्याच वेळी मंचाच्या डावीकडून मुंडासे डोक्याला गुंडाळलेले स्वच्छ शुभ्र पोषाख केलेले दोन भागवत प्रवेशतात. त्यांनी हातात केशरी चौकट असलेला तांबूस रंगाचा पाट धरलेला. त्याला मध्यभागी गणेशचिन्ह असलेली तबकडी आणि मग वाद्यांच्या तालावर अप्रतिम पदन्यास करीत दोन युवती मंचाच्या उजवीकडून येतात – गणेशस्तुतीला आरंभ होतो.

अगदी ढोलक्याच्या वाढत्या कडाक्यानंतर गणाने तमाशाची सुरुवात होते. त्यालाच समांतर प्रकार; पण हा प्रकार होता कर्नाटकी लोकनाट्याचा. यक्षगानाचा एक प्रयोग सादर होत होता. नृत्यनाट्याचे नाव होते भीष्म–विजय.

यंदाचे ज्ञानपीठ – पारितोषिक जाहीर झाल्यापासून 'यक्षगान' हे नाव रसिकांना अपरिचित राहिलेले नाही. ज्ञानपीठविजेते डॉ. शिवराम कारंथ यांच्याबरोबर ज्ञानपीठ-विजेत्या 'मुकज्जिये कनसुगळु'पेक्षा यक्षगानाचेच नाव अधिक संलग्न झाले आहे. यक्षगान हा कर्नाटकातील खेड्यापाड्यांतून कित्येक शतकांपासून चालत आलेला एक कलाविष्कार. नृत्य, संगीत आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेला हा प्रकार बहुतेक वेळा लोकांकडून संस्कारित झाला; पण हे संस्करण व्यावहारिक गरजा भागविण्यासाठी होते. उदाहरणार्थ – रात्री आठ-आठ, नऊ-नऊ तास चालणारे यक्षगानाचे प्रयोग पुढे पुढे तीन-चार तासांवर आले. आधी यक्षगानात असलेली भरमसाट गाणी कमी होऊन त्यांची जागा संवादांनी घेतली. थोडक्यात आपल्या नाटकाप्रमाणेच यक्षगानाचा प्रवास चालू होता; पण एक कलाविष्कार म्हणून त्याच्यावर जाणीवपूर्वक संस्करण कोणीही केले नव्हते. कदाचित उत्तरेकडील रामलीलावाल्यांप्रमाणे पोटासाठी यक्षगान सादर करणाऱ्या कलाकारांच्या तापसांना हा एक कलाविष्कार आहे, याची जाणीवच नसल्याने त्यांना अशा प्रयोगशीलतेची वा संस्करणाची आवश्यकताच भासली नसावी. हे महत्त्वाचे कार्य केले डॉ. शिवराम कारंथ यांनी! 'यक्षगान' या आविष्कारासंबंधात त्यांनी अनेक प्रयोग केले आणि त्याला आजचे स्वरूप दिले. अजूनही त्यांचे प्रयोग चालूच असतात. नवे काही सुचत असते, अमलात आणले जात असते. त्यातून नवे काही सापडत असते. डॉ. कारंथांनीच सांगितल्याप्रमाणे त्यांनी या प्रयोगांसाठी, या बदलांसाठी अनेक ठिकाणांहून प्रेरणा घेतली आणि नृत्य, गायन आणि अभिनय यांमध्ये जास्तीत जास्त चिद्रूपता (harmonization) आणली.

डॉ. कारंथांनी यक्षगानाला मुख्यतः नृत्यनाट्याचे ( ballet ) स्वरूप दिले आहे. सर्व पात्रांचे संवाद त्यांच्या तोंडून काढून टाकले आहेत. सर्व संवाद पडद्याआडून एकच सूत्रधार फेकतो – तेही गीतस्वरूपात. त्या संगीताच्या तालावर सर्व पात्रांच्या हालचाली नृत्यबद्ध केलेल्या असतात, हे या नृत्यनाट्याचे प्रमुख स्वरूप. बाकी बारीकसारीक गोष्टी किती तरी आहेत. पात्रांच्या वेशभूषा व रंगभूषेविषयी – या दोन्हींवर कथ्थकलीचा प्रचंड प्रभाव आहे. पात्रांचे वेश अत्यंत भडक व अत्यंत रंगीबेरंगी. बहुतेक रंग अत्यंत पारंपारिक सूचक वापरलेले. उदाहरणार्थ – गुणी, उदात्त पात्र मरून वा गर्द चॉकोलेटी रंगाच्या पोषाखात. वैभवसंपन्न पात्र जर्द पिवळ्या रंगात. राक्षस अथवा तत्सम पात्रे म्हणजे तांबडा, हिरवा अशा विरोधी रंगांची उधळणच. आणखी एक वैशिष्टय म्हणजे पुरुषपात्रे ( अर्थात राजे, राक्षस वा देव अशी पुरुषपात्रे. दूत, सेवक इत्यादि पात्रे साध्याच पोषाखात असतात. ) स्त्रीपात्रांपेक्षा किती तरी जास्त नटलेली. स्त्रियांच्या वेशभूषेत व रंगभूषेत वैचित्र्यापेक्षा आकर्षकतेसाठी व सौंदर्यवृद्धीसाठी भडकपणा अत्यंत कमी. अर्थात हेही फक्त मानवी स्त्रिया वा देवतांबाबत असावे. राक्षसी कदाचित उग्र म्हणून भडक दाखविल्या जात असाव्यात. वेशभूषेमध्ये सर्वांत चटकन लक्ष वेधून घेणारा प्रकार म्हणजे पात्रांचे मुकुट. मोराच्या फुललेल्या पिसाऱ्याप्रमाणे डोक्यामागे शोभणारा, एखाद्या तेजोवलयाप्रमाणे मस्तकाभोवती पसरलेला, एकावर एक उतरंड रचलेल्या घागरीप्रमाणे डोक्यावर चढत गेलेला असे निरनिराळ्या आकाराचे मुकुट केवळ डोळे खिळवून ठवीत होते. शिवाय हे मुकुट कर्णभूषणांना जोडलेले असल्याने साहजिकच प्रेक्षकाचे लक्ष पात्राच्या चेहऱ्याकडे म्हणजे भावदर्शनाकडे राहतेच.

वेशभूषेतील वरील सर्व वैशिष्टचे रंगभूषेलाही लागू आहेत. उदाहरणार्थ – दैवी पात्रांचा रंगभूषा त्यांची भव्यता व ऐश्वर्य मनावर उमटावतील अशी; तर आसुरी पात्रांची उग्रता त्यांच्या रंगभूषेच्या प्रत्येक छटेतून प्रगट व्हावी. नुसते पाहिले असता रंगाचे थर अथवा पट्टे मारले असल्यासारखे दिसून हास्यास्पद वाटणारी ही रंगभूषा प्रत्यक्ष प्रयोगात मात्र अत्यंत जिवंत व प्रभावी वाटते; कारण तिच्या भडकपणामुळे त्या पात्राची व्यक्तिमत्त्वरेखा प्रेक्षकांपुढे उमटते आणि त्या पात्राच्या अभिनयातील अत्यंत छोटासा बारकावाही प्रेक्षकामधील शेवटच्या प्रेक्षकापर्यंत अत्यंत सामर्थ्यानिशी पोहोचतो. उदाहरणार्थ – संगीताच्या तालावर होणारी डाळभांची हालचाल ही डोळे कोरून व रंगवून मोठे केल्यामुळेच लक्षात येते.

डॉ. कारंथांनी यक्षगानाला असे नवे रूप दिले असले तरी आशयाच्या दृष्टीने त्यांनी त्याचे जुने स्वरूप फारसे बदलले नाही. अजूनही डॉ. कारंथ यक्षगायनाच्या प्रयोगांमधून पुराणकथाच सांगत असतात. त्यात दोन उद्देश असावेत – एक यक्षगानातील यक्ष आणि गान या दोन्ही गोष्टी कायम ठेवणे.

परंपरागत चालत आलेला आशयाचा ठेवाच पुढे चालू ठेवून या लोककलाविष्काराचे स्वरूप लोककला अशाच शुद्ध स्वरूपात जतन करणे आणि दुसरा त्याहीपक्षा महत्त्वाचा उद्देश म्हणजे या नृत्यनाटयाचे आविष्कार-रूप हे जितके काल्पनिक, वास्तवापल्याडचे आहे तितकीच स्वप्नरम्यता, कल्पनागर्भता वास्तवाच्या क्षितिजापलीकडे चमकणाऱ्या पुराणकथांमध्येच भरलेली असल्यानेही तोच आशय कायम ठेवला आहे. शिवाय कारंथां-सारख्या आदिम मानवी मूल्यांचा शोध घेणाऱ्या प्रतिभावंत कलावंताचे पंख अतीता-तही सारख्याच समर्थतेने व सहजतेने झेपावत असल्याने प्रेक्षकाला हे काल्पनिक दर्शन अवा-स्तव वा खोटे वाटत नाही.

तंत्रविषयक वा आविष्काराबाबत मात्र 'यक्षगान' अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे.

प्रत्येक प्रवेश सुरू होण्यापूर्वी दोन व्यक्ती सुरुवातीला उल्लेख केलेला एक पाट धरून मंचाच्या मध्यभागी उभ्या असतात. त्यानंतर त्या प्रवेशातील पहिली व्यक्ती त्या पडद्या-मागे येऊन नृत्य करते. अर्थात हा पडदा आकाराने लहान असल्याने ते नृत्य प्रेक्षक पाहू शकतात. त्या नृत्यावरून त्या व्यतीचा स्वभाव स्पष्ट होतो. आवश्यकता असल्यास संगीतावरोबरच ती व्यक्तीही तोंडाने आवाज काढते. उदाहरणार्थ–राक्षसाचे पात्र 'होऽऽऽ' असा भीतिदायक आवाज काढते. नंतर पात्राने तो पडदा बाजूला केला की, त्याचे आगमन झाले. अर्थात प्रवेशबदलासाठी हा पडदा धरण्याची सोय सुरुवातीच्या तीन प्रवेशांपुरती म्हणजे प्रेक्षकांना या प्रवेश-बदलाची सवय होण्यापुरतीच होती. नंतर सलग, एकसंध नाटक म्हणजे एकापुढे एक प्रवेश सुरू झाले. बहुतेक आगमने (entries) रंगमंचाच्या डाव्या बाजूने आणि निर्गमने (exits) उजव्या बाजूने होत होती.

पात्रांचो पाठीने अभिनय करण्याची हातोटी हे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्टय. आपल्या नाटकांमध्ये बोलताना प्रेक्षकांकडे पाठ न करण्याचा एक अलिखित नियम आहे; पण यक्षगानातील कलावंतांनी पाठीने अभि-नय करता येतो व तो तितकाच प्रेक्षणीय असतो, हे दाखवून दिले. अर्थात नृत्य या प्रकारची साथ असल्यानेही हे शक्य झाले.

'संगीत आणि नृत्य यांची उत्कृष्ट सांगड आणि त्यांचा आशयाशी घातलेला मेळ हे यक्षगानाच्या आविष्कारपद्धतीचे आणखी एक वैशिष्टय. निरनिराळया moods साठी, पात्रांसाठी वेगवेगळ्या प्रकारची वाद्ये वापर-लेली असतात. उदाहरणार्थ–पुरुषपात्रासाठी जाड आवाजात वाजणारे क्लॅरोनेटसारखे वाद्य तर स्त्रीपात्रासाठी व्हायोलिन. असाच फरक क्रोध, दुःख, आनंद, भीती अशा moods च्या बाबतीत. केवळ आवाजातच नव्हे, तर संगीताच्या गतीमध्येही हा फरक केलेला.

नृत्यातील पात्रांच्या हालचाली, त्यांचे पदन्यास, मुद्रा, मुद्रिक अभिनय यांतही असाच फरक होत असे. अगदी उभे राह-ण्याची प्रत्येक पात्राची ढब म्हणजे सुद्धा त्याच्या व्यक्तिरेखेला ठळकपणा आणणारा एखादा तुकडा. शिवाय एका पात्राचे संवाद चालू असताना अन्य पात्रे आपल्या mood ला साजेशा हालहाली, प्रतिसाद देणे चालूच ठेवीत असल्याने त्या पात्राला उठाव देणारी संपूर्ण विरोधी वा फिकी पार्श्वभूमीच इतर पात्रां-मुळे तयार होते आणि संपूर्ण नाटकालाही जिवंतपणा मिळतो.

पात्रांच्या नृत्यमय हालचालींबद्दल काय लिहिणार? जलविहारापासून, सौंदर्यप्रसा-धन करण्यापासून द्वंद्व, अग्निकाष्ठभक्षणा-पर्यंत सर्वच गोष्टी साऱ्यांनी आमच्यापुढे अक्षरशः जिवंत केल्या. त्याबद्दल कितीही लिहिले वा वाचले, तरी समाधान होणार नाही! प्रत्यक्ष तो आविष्कार पाहणे, त्या नृत्य-स्पंदनांनी थरारणे हाच खरा आनंद!

कारंथांच्याबद्दल म्हणायचे तर–कथ्थ-कलीचे पुनरुज्जीवन करणाऱ्या महाकवी नारायण वळ्ळतोर–प्रमाणे यक्षगानाला पुनरुज्जीवन देऊन त्यांनी शतकांच्या भूत-काळाला वर्तमान बनविले आहे.

विशेष म्हणजे असे नवजीवन देतानाही त्यांनी यक्षगानाला तंत्राचा एक सांगाडा दिला; पण त्याचा भक्कम, चिरेबंदी बंदिस्त साचा वा चौकट केलेली नाही, यक्षगानाचे शास्त्र बनविलेले नाही. यक्षगानातील पात्रे जिवंतपणे, मुक्तपणे मंचावर वावरतात. त्यांच्या हालचाली बांधीव वा विस्कळित नसतात, तर रेखीव असतात. मंचावर गर्दीचा गोंधळ चालू नसतो; तर परस्परांशी संलग्न अशा समूहाच्या आकर्षक रचना सादर होत असतात. त्या रचनांच्या मुक्त-पणामुळेच त्यांमध्ये symmetry असो अथवा नसो, त्या लोभसवाण्याच होतात. अशा मुक्त कलाविष्कारामुळेच जेव्हा तुम्ही यक्षगान पाहात असता; तेव्हा तुमच्यापुढे भूतकाळ वर्तमान बनतो. ☐


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध**

**स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

शिवाय दैनंदिन जीवनातील व्यवहार कसे करावेत याबद्दल अंधांना प्रशिक्षण देणारा एक विभागही आहे.

ही कार्यशाला हलक्या आणि साचेबंद यांत्रिक कामांची कंत्राटे कंपन्यांकडून मिळवते व अंधांकडून ती पुरी करून घेते. कार्यशाळेत प्रशिक्षण मिळाल्यानंतरही नोकरी मिळणे हा एक मोठा गंभीर प्रश्न रहातोच. तो सोडविण्यासाठी एक 'रोजगार विभाग' या कार्यशालेत उघडण्यात आला असून प्रशिक्षित अंधांना नोकरी मिळवून देणे हे याचे काम. या संस्थेशी व इतर अनेक सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध असलेले श्री. विजय मर्चंट यांनी आपल्या कापडगिरणीत सुमारे पन्नास–साठ अंधांना रोजगार दिला आहे; पण असा उद्योगपती विरळाच !

या संस्थेत प्रवेशासाठी जवळजवळ रोज एक–दोन अर्ज येत असतात. अर्थात हे स्वाभाविकच आहे. कारण अंधांसाठी इतकी चांगली संस्था भारतात इतरत्र नाही ! शिवाय आजमितीस भारतात सुमारे ५० लाख अंध आहेत व ही संख्या जगातील एकूण अंधांच्या १/३ एवढी आहे. समस्येचं हे गंभीर स्वरूप लक्षात घेता अशा संस्था देशात इतरत्र निघण्याची गरज आहे.

अंध आणि सर्वच अपंगांविषयी सहानुभूती सर्वांनाच असते. अंध–दिनाच्या दिवशी ती मोठ्या प्रमाणावर व्यक्त होते; पण या सहानुभूतीपोटी सातत्याने अंधांसाठी काम करणं ही गोष्ट सोपी नाही. अंधांना नवजीवन देण्यासाठी, त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी अंधसंघटना व ही कार्यशाळा जे काम करीत आहे ते पाहून मन थक्क होतं ते याच पार्श्वभूमीवर ! □

## □ टॉलस्टॉय : १५० वी जयंती

विख्यात रशियन कादंबरीकार, साहित्यिक लिओ टॉलस्टॉयच्या १५० व्या जयंतीचे हे वर्ष आहे. मुंबईतील सामाजिक सांस्कृतिक संघटनांच्या वतीने टॉलस्टॉयची १५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रशियन वकिलात व सोविएत सांस्कृतिक केंद्राच्या वतीनेही चर्चा, भाषणे, टॉलस्टॉयच्या साहित्यावर परिसंवाद, त्याच्या पुस्तकांचे प्रदर्शन इ. अनेकविध प्रकारे टॉलस्टॉयला आदरांजली वाहण्यात आली. काही कार्यक्रमांमधून टॉलस्टॉयच्या जीवनावर आधारित एक चांगली फिल्मही दाखविली गेली.

गेल्या महिन्याच्या अखेरीस भारत सोविएत सांस्कृतिक संघाच्या (इस्कस)वतीने, धिया सभागृहात टॉलस्टॉयचे 'जीवन आणि साहित्य' या विषयावर एक परिसंवाद आयोजिण्यात आला होता.

कार्यक्रम नियोजित वेळेपेक्षा पंधरा–वीस मिनिटे उशीरा सुरू झाला. याचं कारण श्रोत्यांची कमतरता ! पुरेसे श्रोते जमल्यावर कार्यक्रम सुरू झाला; पण त्यामुळे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणमंत्री सदानंद वर्दे यांना उगीचच (त्यांच्या वक्तशीरपणामुळे) ताटकळत बसावं लागलं.

'इस्कस'चे श्री. बटुक देसाई यांच्या प्रास्ताविकानंतर प्रा. वर्दे यांचं भाषण झालं. सुंदर इंग्लिशमधलं प्रा. वर्दे यांचं भाषण निश्चितच श्रवणीय होतं. टॉलस्टॉयची कथाकथनाची शैली आणि एकूणच त्याचं कादंबरीतंत्र म्हणजे अभिजात आणि शाश्वत मानवी मूल्यांचा शोध घेण्यासाठी केलेला एक प्रवास होय' असं त्यांनी सांगितलं. 'रीझरेक्शन'पासून वॉर अँड पीस'पर्यंत त्याची कोणतीही कादंबरी म्हणजे एक स्थलकालनिरपेक्ष असं मानवी आवाहनच आहे अशा शब्दांत त्यांनी टॉलस्टॉयचा गौरव केला.

या कार्यक्रमातली पहिली तीन भाषणं खूपच अभ्यासपूर्ण आणि म्हणून ऐकावीशी वाटली. त्यातच, मॉस्को विद्यापीठातील वाङमयविभागाचे प्राध्यापक व एक रशियन समीक्षक प्रा. युरनॉव यांचंही भाषण आहे. प्रत्येक कादंबरीच्या शीर्षकापासून सुरुवात करून कादंबरीतून अधोरेखित झालेले सिद्धान्त किंवा जीवनमूल्ये यांचं स्पष्टीकरण करण्याची आणि तेही थोडक्यात, मुद्देसूदपणे मांडण्याची प्रा. युरनॉव यांची हातोटी विलक्षण प्रभावी होती.

'वॉर अँड पीस'बद्दल ते म्हणाले, 'पीस' या शब्दाचा रशियातील संदर्भ केवळ शांतता इतकाच मर्यादित नाही. शांततेबरोबरच एकता किंवा अखंडता असाही एक अर्थ या शब्दातून ध्वनित होतो व त्याच अर्थाने हे शीर्षक योजण्यात आलं असावं. ही कादंबरी म्हणजे युद्धानंतरच्या शांततेतील, स्वातंत्र्यातील, रशियामधील एकात्मतेच्या जडणघडणीचा अप्रत्यक्ष इतिहास आहे. 'ऑक्टोबरक्रांती' घडून येण्यामागे जी एक दीर्घ प्रक्रिया कारणीभूत आहे तिचं वस्तुनिष्ठ चित्रण टॉलस्टॉयने केल्यामुळे, आधुनिक रशियाचा किंवा आधुनिक रशियन मनाचा निर्माता असं टॉलस्टॉयचं सार्थ वर्णन करता येईल.

या परिसंवादातलं तिसरं उल्लेखनीय भाषण 'परिक्रमा' फेम हिंदी साहित्यिक कमलेश्वर यांचं. परिसंवादामधली सर्व भाषणं इंग्लिशमधून झाली; पण कमलेश्वरजी मात्र आग्रहपूर्वक हिंदीतून बोलले. कमलेश्वर आपल्या भाषणात म्हणाले की, टॉलस्टॉयच्या साहित्यातून आणि सिद्धान्तातून कळत न कळत आमच्या भारतीयांच्या धारणा हळूहळू बदलत गेल्या आहेत. सत्य हे निरपेक्ष आहे असे भारतीय तत्त्वज्ञांचे विचार होते; पण टॉलस्टॉयने आपल्या साहित्यकृतींमधून ही गोष्ट स्पष्ट केली की, सत्य हे कधीच निरपेक्ष असू शकणार नाही. शिवाय जगातील फार कमी साहित्यिक विचारवंतांनी समाजाचा सांस्कृतिकदृष्टचा विचार केला आहे. टॉलस्टॉय मात्र नेहमीच समाजाला एका, 'एकजीनसी सांस्कृतिक समूहाच्या' स्वरूपात बघत आला आहे. अवघ्या समाजाला त्यानं एक सांस्कृतिक व्यक्तित्व दिलं आहे.

आपल्या भाषणाचा शेवट करताना ते म्हणाले,... टॉलस्टॉय दीडशे वर्षांपूर्वी जन्मले; पण आजही आपल्याला ते समकालीन वाटावेत असं त्यांचं चिरतरुण साहित्य आहे. तेव्हा टॉलस्टॉयच्या साहित्याचा अभ्यास जरूर झाला पाहिजे, त्याचा गौरवही केला पाहिजे; पण हे करताना त्यांना दूर देव्हाऱ्यात बसविणे मात्र टाळले पाहिजे.'

शवटच्या दोन वक्त्यांपैकी एक होते गुजराती प्राध्यापक श्री. चंद्रकान्त बक्षी ! त्यांनी आपल्या भाषणात टॉलस्टॉयची दैनंदिनी आणि त्याआधारे त्याच्या जीवनव्यवहारांवर चांगला प्रकाश टाकला. शिवाय टॉलस्टॉयने लहान मुलांसाठी जे सकस बालवाङमय निर्माण केले, त्याचीही विस्ताराने माहिती सांगितली.

शेवटी प्रा. पंडित आवडीकर बोलले. त्यांच्या विवेचनात 'अॅना कॅरेनीना' ही टॉलस्टॉयची कादंबरी हा मुख्य विषय होता. लेविन हे या कादंबरीतील एक पात्र टॉलस्टॉयने स्वतःची व्यक्तिरेखा उभी करण्यासाठी कसे वापरले ते श्री. आवडीकर यांनी स्पष्ट केले. त्यांच्या भाषणानंतर टॉलस्टॉयच्या जीवनावर एक फिल्म दाखविण्यात आली.

महात्मा गांधी टॉलस्टॉयला गुरुस्थानी मानीत. त्यामुळे टॉलस्टॉयबद्दल सर्वच भारतीयांना सविस्तर माहिती नसली तरी सामान्य कुतूहल आणि माहितगारांना प्रेम नक्कीच आहे. टॉलस्टॉयच्या साहित्यकृतींना जागतिक मानमान्यताही आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर हाच परिसंवादाचा कार्यक्रम अधिक अभ्यासू व्यक्तींना बोलावून व त्याला सविस्तर प्रसिद्धी देऊन करणे कठीण नव्हते.

पण अखेर इस्कस ही सांस्कृतिक संस्था एका विशिष्ट विचारसरणीच्या मंडळींनी काबीज केलेली आहे. तेव्हा कुणी सांगावं; श्रोत्यांना 'कॉम्रेड' म्हणून संबोधणारे वक्तेच बोलवायचे असाही 'इस्कस'चा अट्टाहास असू शकेल ! ◻

## ◻ प्रौढ शिक्षण मोहीम

दोन ऑक्टोबरपासून केंद्रीय शिक्षणखात्याचा, महत्त्वाकांक्षी असा 'प्रौढ शिक्षण कार्यक्रम' सुरू झाला आहे. त्याच दिवशी रवीन्द्र नाट्यमंदिरात राज्याच्या शिक्षणखात्याच्या वतीने या मोहिमेचं उद्‌घाटन राज्यपालांच्या हस्ते पार पडलं.

उद्‌घाटनादी सोपस्कार पार पडले असले तरी प्रत्यक्षात ही मोहीम एप्रिल १९७९ पासून सुरू होईल. त्यानंतरच्या पाच वर्षांत किमान साडेतीन कोटी प्रौढ साक्षर व्हावेत हे या कार्यक्रमाचं लक्ष ठरविण्यात आलं आहे. या कार्यक्रमासाठी २०० कोटी रु.ची तरतूद असल्याचे यापूर्वीच प्रसिद्ध झाले आहे. हा कार्यक्रम प्रत्यक्षात सुरू होण्यापूर्वी या कार्यक्रमांतर्गत जो अभ्यासक्रम राबविला जाणार आहे त्याची आखणी पूर्ण होईल असा अंदाज आहे.

महाराष्ट्रात १५ ते ३५ या वयोगटातील एकूण ७० लाख लोक निरक्षर आहेत. समयबद्ध कार्यक्रमात या सर्वांना साक्षर करण्यासाठी राज्यसरकार सुमारे ४००० प्रौढ शिक्षणकेंद्रे उघडणार आहे. शिवाय केंद्र सरकार निवडक चौदा जिल्ह्यांत आणखी ३०० प्रौढ शिक्षणकेंद्रे सुरू करील. इतर राज्यांच्या तुलनेत या मोहिमेचे महाराष्ट्र शासनाने केलेले नियोजन उल्लेखनीय ठरेल. पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकनिर्मिती, देखरेख, अधिकाऱ्यांच्या नेमणुका, केंद्रांची व्यवस्था ही सर्व जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्यात नुकतीच एक 'राज्य प्रौढ शिक्षणसंस्था' स्थापन करण्यात आली आहे.

निरक्षर व्यक्तींना आपली लोकशाही शासनपद्धती जाणवावी व या पद्धतीनुसार सक्रिय व निर्णायक भूमिका त्यांना पार पाडता यावी यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी पशुपालन, गाई-म्हशींचे आजार व उपाय, कोंबड्या पाळणे, शेती इ.चेही प्रशिक्षण दिले जाईल. महिलांसाठी बालसंगोपन, कुटुंबकल्याण, शास्त्रीय पाकशास्त्र इत्यादी जीवनोपयोगी ज्ञान अक्षरे गिरवितानाच दिले जाईल.

वनवासी मंडळींपर्यंत हा कार्यक्रम पोहोचला तर त्यांना या कार्यक्रमाचे फायदे तर मिळतीलच; पण स्वयंसेवी संघटनांच्या कार्यकर्त्यांना वनवासी जीवनाची जवळून ओळख करून घेता येईल. त्या दृष्टीने आदिवासी उपयोजनेशी या मोहिमेची घातलेली सांगड उल्लेखनीय आहे.

प्रौढ शिक्षणाइतकेच प्राथमिक शिक्षणही महत्त्वाचे आहे. दादाभाई नौरोजींनी गेल्या शतकातच प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा आग्रह धरला होता. ती सूचना अंमलात आणण्याइतके सुज्ञ राज्यकर्ते त्या काळी नव्हते, म्हणून आज प्रौढ शिक्षणावर एवढा खर्च करावा लागत आहे. काहीही असो, 'मतपत्रिका किंवा बंदुकीच्या गोळ्या जे बदल घडवू शकत नाहीत ते शिक्षणामुळे घडू शकतात.' अशा आशयाचे एक वचन प्रसिद्ध आहे. त्याचा थोडाफार अनुभव प्रौढ शिक्षणाच्या फलनिष्पत्तीत मिळाला तरी खूप ! ◻

रंगभूमी । सतीश कामत

# तुझी वाट वेगळी !

## वाटा ज्या कधी जुळल्याच नाहीत

बाळ कोल्हटकरांच्या 'कांते फार तुला मजसाठी' नंतर महिन्याभराच्या आतच मराठी रंगभूमीवर आलेलं 'नाट्यसंपदे'चं 'तुझी वाट वेगळी' हे दुसरं संगीतप्रधान नाटक; पण अर्थात 'कांते फार तुला...' पेक्षा पुष्कळच सुसह्य !

जयपालसिग हे सावनगढ संस्थानाचे राजे. अत्यंत न्यायी, प्रजाहितदक्ष वगैरे वगैरे. साहजिकच सूरजित हे त्यांचे चिरंजीव रंगेल. नाच–गाण्यातच सदैव बुडलेले. स्वतःला कलेचे मोठे चाहते आणि रसिक समजणारे. नाटकाची सुरवात याच पार्श्वभूमीवर होते. राजेसाहेबांना दिवाणजी राज्यातील एकंदर परिस्थितीचा, तसंच युवराज सूरजित यांच्या एका सफरीचा अहवाल देत असतात. याच सफरीत चंदा नावाच्या एका नाच-गाणं करणाऱ्या तरुण मुलीवर बेहद्द खूष होऊन सूरजित तिला आपल्याबरोबर खुद्द सावनगढमध्ये घेऊन आलेले असतात. मोतीबाग या सावनगढमधील शाही पाहुण्यांच्या निवासाच्या ठिकाणीच तिला ठेवललं असतं. दिवाणजी सफरीचा सर्व वृत्तांत जयपालसिगाच्या कानांवर घालीत असतानाच, आपण चंदाचे बाप आहोत आणि तिला सावनगढमधून घेऊन जाण्यासाठी आलो आहोत, असं सांगणारा कालीचरण हजर होतो. इतकंच नव्हे तर सूरजितने आपल्या मुलीला फूस लावून पळवून आणल्याचाही आरोप तो करतो.

न्यायप्रिय जयपालसिग क्रोधाने लाल होतात. दिवाणजी आणि सावनगढ संस्थानाचे आश्रित गायक पंडित हरिप्रसादजी यांच्यासह ते आपला मोर्चा तावडतोब मोतीबागेवर वळवतात. मोतीबागेत युवराज चंदाचं 'तुझ्या प्रीतीची साक्ष असावी, रे सजणा मजपाशी' हे गाणे ऐकत बसलेले असतात. जयपालसिग गाण्याचे सूर ऐकूनच संतुष्ट होतात. कारण ते स्वतःही संगीताचे भोक्ते असतात. पंडित हरिप्रसादजी तर चंदाच्या आवाजावर बेहद्द खूष असतात. सूरजित यांच्याबरोबर सफरीवर असतानाच त्यांनी तिचं गाणं ऐकलेलं असतं. किंबहुना, आपल्याजवळील संगीताचा ठेवा देण्यास हीच लायक आहे, असं त्यांचं मत झालेलं असतं. चंदाच्या पळून येण्याबद्दल जयपालसिगांनी विचारल्यानंतर हे उघड होतं की, कालीचरण हा चंदाचा खरा बाप नसून रस्त्यावर सापडलेल्या या अनाथ पोरीला लहानपणीच उचलून त्याने वाढवलेलं असतं; गायनकला शिकवलेली असते. पण आता चंदा त्याच्याकडे जायलाच नाकबूल असते; हे कळल्यावर राजेसाहेब, चंदाने सावनगढमध्येच राहून पंडित हरिप्रसादजींच्या मार्गदर्शनाखाली संगीतसाधना करावी, असं फर्मान सोडतात. चंदा राजेसाहेबांना आणि पंडितजींना 'तो मला छळतो असा, काय बाई मी करू चाँद अस्मानातला हा, रात आली ही सरु' हे गीत म्हणून दाखवते आणि पंडितजींचं शिष्यत्व पत्करून अध्ययनाला सुरवात करते.

एव्हाना सूरजित आणि चंदा यांचे प्रेमसंबंध जुळू लागलेले असतात; पण आपल्या पुत्राने एका गाणाऱ्या, घराण्याचा कोणताही इतिहास नसणाऱ्या सामान्य मुलीशी लग्न करावं, हे राजेसाहेबांना पटणारं, पचणारं नसतं. ते आपल्या तोला – मोलाच्या घरामधली मुलगी परस्पर पाहून विवाह ठरवून टाकतात. युवराजांना हे कळल्यावर ते बरच आकांड-तांडव करतात; पण चंदाच त्यांना, 'मी तवायफ आहे', असं सांगून धक्का देते. युवराज या ठिकाणी ज कोसळतात ते पुढे कधी उभेच राहू शकत नाहीत. (अर्थात, मानसिक पातळीवर !) पहिल्या अंकाच्या शेवटी चंदा, रामसिग नावाच्या युवराजाच्या शरीररक्षकाला सांगते, 'रामसिग, महाराजांना सांग, त्यांनी 'टाकलेली जबाबदारी' मी पार पाडली !'

अर्थात यामुळे चंदाला आपला मोतीबागेतला मुक्काम हलवावा लागतो. ती आता पंडितजींच्या घरीच राहू लागते. पण जयपालसिगाचं निधन होतं आणि आता 'राजाश्रय संपला,' हे ओळखून पंडितजी शिष्येसह मुंबईला प्रयाण करतात. संगीतसाधना चालूच असते. सूरजित चंदाचा पत्ता काढीत मुंबईला येतो. पंडितजी बाहेर गेलेले असतात. पंडितजी बाहेरून येतात. सूरजितला पाहून आश्चर्यचकित होतात; पण त्यामुळे त्यांच्याकडून सूरजितचा न कळत अपमान होतो. अपमानित झालेला सूरजित बाहेर पडतो तोच चंदाचा तथाकथित पिता कालीचरण हजर होतो. त्याने चंदाच्या काही मैफिली परस्परच ठरवून टाकलेल्या असतात. अर्थातच पंडितजींना हे मान्य नसतं. चंदा तर कालीचरणकडे जायलाच घाबरत असते. त्यामुळे पंडितजी चंदाला न पाठविण्याच्या बदल्यात त्यांनी बक्षिसी म्हणून मिळविलेली अनेक पदके, मोत्यांचे हार, कंठमणी कालिचरणला देऊन त्याला वाटेला लावतात.

पण या सगळ्या प्रकारातून पंडितजींच्या एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, यापुढे चंदाला अशा तऱ्हेने अनाथपणे ठेवणं अधिकाधिक कठीण जाणार आहे. त्यामुळे ते यावर एक तोडगा शोधून काढतात–चंदाने पंडितजींशी विवाह करावा. दोघांमधील वयाचं अंतर पिता-पुत्रीइतकं असत. तसंच पंडितजी हेही स्पष्ट करतात की, लौकिक अर्थाने आपण जरी पती-पत्नी असलो तरी आपलं खरं नातं पिता-पुत्रीचं, गुरु–शिष्यचंच आहे आणि राहील ! चंदाही हे मान्य करते आणि इथेच दुसरा अंक संपतो.

तिसरा अंक सुरू होतो तोच मुळी चंदाला यशाची बातमी देत. सरकारतर्फे तिला पद्मविभूषण हा किताब मिळालेला असतो. (आता संबध कथाच संस्थानिकाच्या काळातली असल्यामुळे पद्मविभूषण हा किताब सध्या अस्तित्वात नसला तरी तव्हा तो होता, हे या ठिकाणी लक्षात ठेवायला हवं.) पंडितजीही संतुष्ट होतात. एवढ्यात कालीचरण पुन्हा यतो. पुन्हा त्याने चंदाच्या मैफिली ठरविलेल्या असतात. पंडितजी कालीचरणला कसबसं वाटेला लावतात तोच सूरजित प्रवेश करतो. या वेळी मात्र सूरजित मनाने व देहानेही, संपूर्णतः खचलेला असतो. त्याचा जुना पॅलेस त्याने विकलेला असतो; परंतु त्याचा ताबा सोडण्यापूर्वी चंदाच्या गाण्याचे सूर त्यामध्ये एकदा तरी गुंजावेत, अशी सूरजितची इच्छा असते. म्हणून तो चंदाला निमंत्रण द्यायला आलेला असतो. चंदा तयार होते. पंडितजीही, 'ती संपन्न आहे, मी रिक्त आहे, यातच मला

समाधान आहे,' असं म्हणत परवानगी देतात. तसंच सूरजित निघून गेल्यावर मुंबई सोडून उर्वरित आयुष्य सावनगढलाच घाल- विण्याचा आपला निर्णय ते चंदाला बोलून दाखवतात.

चंदा सूरजितच्या पॅलेसवर जाते. गाणं होतं. सूरजित तृप्त होतो; पण या तृप्ततेतच तो अखेरचे क्षण मोजत असतो. चंदाशी बोलताना प्रत्येक वाक्यागणिक त्याला धाप लागत असते, श्वास अडकत असतो. अशाच अवस्थेत सूरजित राज्यारोहणाचा कंठा चंदाला बक्षीस म्हणून देऊन टाकतो आणि तथाकथित 'राजसिंहासना'वर बसत बसत शेवटचा श्वास घेतो. चंदा पुन्हा एकटीच राहते.

## अयशस्वी प्रेमाची शोकांतिका

या नाटकाबद्दल एका वाक्यात बोलायचं तर ही दोन प्रेमी जिवांच्या अयशस्वी प्रेमाची शोकांतिका आहे. सूरजित आणि चंदा हे दोघेजण परस्परांवर निरतिशय प्रेम करत असूनही केवळ त्यांचे समाजातील वर्ग फार भिन्न, अगदी दोन टोकांचे असल्यामुळे ते एकत्र येऊ शकत नाहीत. चंदाचं दुःख अधिक दाहक आहे. कारण तिच्या आयुष्यातले चढ उतारच असे असतात की, कुणाचा तरी आधार आहे असं वाटत असतानाच तो आधार तुटतो. दुसरा मिळतो पण तोही तुटत जातो आणि शेवटी असह्य एकाकीपणच पदरी येतं. रस्त्यावरून उचलून कालीचरणने आधार दिलेला असतो; मग सूरजितबरोबर राजमहालात येते; पुढे पंडितजींच्या घरी, त्यांची पत्नीदेखील बनून राहते. शेवटी मात्र पंडितजीही सोडून जातात आणि सूरजितही! स्वतःच्या गुणांवर तिला लौकिक यश भरपूर मिळत जातं; पण स्त्री म्हणून तिची जी काही स्वप्नं असतील मात्र त्यांचा सतत कोंड- माराच होत राहतो, चुराडाच होतो. सौ. मीरा पणशीकर यांनी हे सर्व भाव प्रभावीपणे दाखवले आहेत; पण त्यांच्या आवाजात एक विशिष्ट एकारलेपण आहे ते बऱ्याच वेळा- त्या गातात तेव्हाही-खटकतं. तसंच बाई रडतात छान; पण हसतात मात्र अगदी भेसूर, हेही या ठिकाणी नोंदलं पाहिजे. सूरजितची भूमिका करणारे कुलदीप पवार पहिल्या अंकात काहीच छाप पाडू शकत नाहीत, कारण युवराजाचा भाव आणि रुबाव ते सांभाळू शकत नाहीत. विशेषतः दीनानाथ टाकळकरांच्या (जयपालसिंग) पार्श्वभूमीवर तर ते फारच फिके, अगदी एक मध्यमवर्गीय नेभळट तरुण वाटतात; पण नाटक जसजसं चढत जातं, तसतशी पवारही प्रेक्षकांची पकड घेऊ लागतात. सर्व उपभोग पायाशी लोळण घेत असतानाही दुःखाचे भोग टाळता येत नाहीत, ही व्यथा त्यांच्या अभिनयातून चांगल्या तऱ्हेने व्यक्त होते. विशेषतः तिसऱ्या अंकातील शेवटचा सीन ते जबरदस्त करतात. त्यांचा अभिनय संस्थानिकांच्या बेगडचा श्रीमंतीचे बुरखे टराटर फाडत जातो; पण दिग्दर्शकाने त्यांना बहुतेक काळ दारूच्या नशेतच ठेवलेलं असल्यामुळे काही वेळा तरी हा माणूस जरा सरळपणे, झोकांड्या न खाता बोलेल तर बरं, असं वाटतं. सुकुमार यांनी कालिचरणची खलनायकी भूमिका चांगली वठवली आहे. त्यांच्या भावड्या दिसणाऱ्या चेहऱ्याचीही यामध्ये त्यांना मदत झालेली आहे. पंडित हरिप्रसादजी या गायनपंडिताचं काम डॉ. वसंतराव देशपांडे यांनी केलं आहे; पण अभिनयामध्ये त्यांचा मुख्य भर डोळे मोठमोठे करून हलवण्यावर अधिक आहे. त्यांची भूमिका गानपंडिताची असल्यामुळे त्यांच्याकडून संगीताची मेजवानी मिळेल, ही रसिकांची अपेक्षा ही लेखक-दिग्दर्शकांनी फोल ठरवली आहे.

याव्यतिरिक्त वसंत शेजाई (दिवाणजी) आ. दे. पाटील (रामसिंग), हिरालाल जैन (भोला), सुमंत मस्तकार (प्यारेलाल) यांनीही आपापली कामं ठीक केली आहेत; परंतु त्यातही आ. दे. पाटील हे रामसिंगाच्या भूमिकेत थोडेसे नजरेला खटकतात. कारण त्यांची उंची फारच कमी आहे आणि नाटकात त्यांचा उल्लेख मात्र युवराजांचे 'रजपूत शरीररक्षक' असा आहे. दिग्द- र्शकांनी या बारीक बाबीची काळजी घ्यायला हवी होती.

नाटकाचे लेखक आहेत 'स्वामी'कार रणजित देसाई! नाटकाची पार्श्वभूमीही संस्थानिकांच्या जमान्याची-थोडीशी ऐति- हासिक-अशी असल्याने देसाई भाषाशैलीच्या बाबतीत बरेच यशस्वी झाले आहेत. काही ठिकाणी उर्दूमिश्रित शब्द, तर तिसऱ्या अंकात युवराजांच्या तोंडी 'तुझसे तेरी याद अच्छी वो कभी शर्माती नहीं, तू आके चली जाती है, वो कभी जाती नहीं,' अशी जोर- दार शेरबाजीही देसायांनी टाकून दिलेली आहे नाट्यतंत्राची बाजूही त्यांनी चांगली सांभाळली आहे. विशेषतः कालीचरण या खलनायकी पात्राचा नाट्याला गती आणि महत्त्वाची वळणं देण्यासाठी चांगला वापर करून घेतला आहे. तसंच मघाशी उल्ले- खिलेली चंदाला आधार मिळणं-तुटणं ही साखळीही त्यांनी चांगली गुंफली आहे.

नाटकाची दिग्दर्शनाची बाजू अरविंद देशपांडे यांनी सांभाळली आहे. त्यातला एक महत्त्वाचा भाग म्हणजे पंडितजी-चंदा यांचं अध्यापन-अध्ययन त्यांनी काही वेळा नुसतं टेपरेकॉर्डरवरच दाखवलंय. (दुसरा अंक सुरू होताना) हे वेळ आणि कंटाळवाणेपणा, दोन्ही वाचविण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. अध्ययनाला बसलेल्या गुरु-शिष्यांपैकी कुणीच; कधीच तानपुरा घेत नाही (मोतीबागेतील प्रसंग वगळता) हे खटकतं. वसंतराव देशपांड्यांना पंडित हरिप्रसादजी बनवताना लावलेले कल्ले बोकडाची दाढी चिकटवल्या- सारखे वाटतात. तसंच पंडितजींकडे राहा- यला आल्यावरही चंदाच्या अंगावर घरात- सुद्धा उंची साड्या असाव्यात, हेही बरोबर नाही. पहिल्या अंकात चंदा जयपालसिंग आणि पंडितजींना जेव्हा गाणं म्हणून दाख- विते तेव्हा रंगमंचाचा काही भाग उगीचच फिरवून दाखवलाय; पण ठीक आहे. प्रेक्षका तल्या प्रत्येक गटाची कोणत्या ना कोणत्या प्रकारे करमणूक झालीच पाहिजे.

नाटक संगीतप्रधान आहे. तेव्हा संगीत- दिग्दर्शकावर जबाबदारी मोठी; पण किशोरीबाई आमोणकरांनी तशी निराशाच केली. त्यातूनही जास्त गाणी मीरा पणशी- करांना आहेत आणि त्यांचे गाताना काही काही शब्द गिळलेच जात होते. गीतकार शांता, शेळके यांनी मात्र 'तो मला छळतो असा-' 'मला वाटतं ग नवा जन्म घेऊ-,' 'रे सांग घना तू, साहू कसा मी-' 'भेदून गगना आरपार तू-' अशी काही चांगली गीतं दिली आहेत.

राजाराम चव्हाण यांचं नेपथ्य चांगलं होतं; पण त्यात अजूनही थोडी सफाई पाहिजे होती. उदाहरणार्थ, पहिल्या अंकात उजव्या बाजूचा सेटचा एक कोपरा नीट न बसल्यामुळे पुढे आला होता.

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे 'कांते फार तुला मजसाठी' हे बाळ कोल्हटकरांचं नाटक आणि 'तुझी वाट वेगळी' हे नाट्यसंपदेचं नाटक, ही दोन संगीतप्रधान नाटकं महिन्या भराच्या आतच रंगभूमीवर आलेली असल्या मुळे ह्या दोन्हींची तुलना होणं स्वाभाविक आहे. अर्थात तशी करायला गेलास साम्या- पेक्षा भेदच अधिक आढळतील. तेव्हा फक्त साम्यांचाच उल्लेख करतो. या दोन नाटकां- मध्ये पहिलं साम्य म्हणजे, संगीत प्रधान नाटकामध्ये गाणं सुरू झाल्यावर नाटक block होणं हा प्रकार इथेही आढळतो. इतकंच नाही तर दोन्ही नाटकांमध्ये बरीचशी गाणी नाटकातल्या पात्रांपैकीच कुणी तरी 'जरा

होऊन जाऊ द्या' अशी फर्माइश केल्यामुळेच सुरू होतात. स्वाभाविकपणे येत नाहीत. ज्यांच्यामुळे या दोन्ही नाटकांमध्ये संगीताचा शिरकाव प्रामुख्याने होतो त्या 'बुवा' ('कांते फार तुला...) आणि पंडित हरिप्रसादजी (तुझी वाट वेगळी) या दोन व्यक्तिरेखांमध्येही फार मोठं साम्य आढळतं. हे साम्य त्यांच्या गायनकलेबद्दलच्या आस्थेमध्ये आहे, पोटतिडकीमध्ये आहे. विचारसरणीमध्ये आहे; गायनकलेबाबत त्यांच्या दृष्टिकोनातही हे साम्य आहे. आणखी एकाच मुद्द्याचा उल्लेख करावासा वाटतो, तो म्हणजे ही दोन्ही नाटके शोकांतिका आहेत. फरक एवढाच की, बाळ कोल्हटकर नाटक melodramatic पातळीवर नेऊन सोडतात, तर देसाई आणि अरविंद देशपांडे ते tragic लेव्हलवर ठेवणंच श्रेयस्कर मानतात. □

## अवती-भवती : पृष्ठ ३ वरून

ती पुन्हा वाढविता येईल का नाही, याबद्दल मला दाट शंका आहे. काही चमत्कार होऊन मी बरा झालो तरीसुद्धा त्या वेळचं वातावरण पुन्हा निर्माण करता येईल, असं नाही मला वाटत. सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या आवाहनाला १९७४ मध्ये मी अग्रक्रम दिला होता. (जे. पीं. चे शब्द असे होते – "This is life as a whole, taken in its totality. My call to you is to begin with yourselves, see how you should change in order to change the society.") समाजव्यवस्थेतल्या या परिवर्तनासाठी गल्या दोन-तीन वर्षांत, जरा बरा असतो, तर मी काही तरी करू शकलो असतो.'

प्रश्न : ग्रामीण विकासामध्ये शहरी संस्था–व्यक्ती कोणता सहयोग देऊ शकतील? सेवाभावी नागरी व्यक्ती–संस्थांनी प्रथम शहरातल्या गरिबांकडेच लक्ष पुरवणं योग्य होणार नाही का? त्याहीपेक्षा, आपला शहरी दृष्टिकोन मुळापासून न बदलता असे लोक ग्रामीण भागात गेले, तर त्यापासून काय निष्पन्न होणार?

ग्रामीण विभागात विकासकार्य करू जाणाऱ्या कार्यकर्त्यांना सखोल प्रशिक्षणाची आवश्यकता आहे, ही गोष्ट जे. पी. मान्यच करतात. चर्चा या विषयावर येताच त्यांचा चेहरा उजळतो. ग्रामविकास हाच गेली अनेक वर्षं त्यांच्या कार्याचा पाया होता, मध्यबिंदू होता. आता त्यांना करता येण्यासारखं विशेष काही नसलं, तरी तोच अजूनही त्यांच्या चिंतनातला जिव्हाळ्याचा विषय आहे. आताही, ग्रामीण उद्योगांमध्ये विविधता आणण्याची आणि ग्रामीण विभागात तयार होणाऱ्या कच्च्या मालावर तिथेच ताबडतोब प्रक्रिया करण्याची जरुरी ते ठासून प्रतिपादन करतात. 'आपल्या आहारातली पोषणमूल्यं वाढविण्याचे मार्ग (खर्च न वाढवितांही–) ग्रामीण गृहिणींना सांगितले पाहिजेत, तर वातावरण आरोग्यकारक राखण्याचे, कचऱ्याची योग्य पद्धतीनं विल्हेवाट लावण्याचे धडे पुरुषांना दिले पाहिजेत– किंबहुना सार्वजनिक आरोग्यासंबंधीचा एक छोटासा अभ्यासक्रमच तयार करायला हवा त्यांच्यासाठी. तरुण मुलांची मदत त्यात मोलाची ठरेल,' जे. पीं.चं विचारचक्र सुरू होतं, 'ग्रामीण विकासकार्यात अमुक इतका वेळ खर्च केल्याशिवाय विद्यार्थ्यांना मॅट्रिकची म्हणा किंवा पदवीची म्हणा, प्रमाणपत्रं मिळणारच नाहीत, असा एक नियमच करायला हवाय्. या मुलांना अशा कार्याचं प्रशिक्षण देऊ शकतील, असे किती तरी जुने गांधीवादी कार्यकर्ते आपल्याकडे आहेत. साधं शेतकऱ्यांना वर्षाकाठी एकाऐवजी दोन पिकं घ्यायला आपण मदत केली तरी त्यांच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीनं ते महत्त्वाचं ठरणार आहे...'

पण अशा वेळी राजकीय पक्षांचा आणि त्यांच्या आजवरच्या कार्याचा विषय निघाला की, जे. पी. अस्वस्थ झाल्यासारखे भासतात. 'हे पक्ष प्रगतीत फार अडथळा आणतात. प्रत्येक पक्ष कोणतीही परिस्थिती ओढूनताणून आपल्याला अनुकूल करून घ्यायला बघतो. सगळ्यांना घोर लागलेला असतो तो पुढच्या निवडणुकीचा. माझ्या चळवळीमधलेही काही तरुण मंत्री झाले, आमदार झाले. त्यामुळेही त्यांची मूल्यं थोडी बदलली असणार. मी क्रियाशील असतो, तर ही गोष्ट थांबविण्यासाठी निश्चितपणे काही तरी करू शकलो असतो निवडणुका लढण्यापेक्षा काही तरी अधिक महत्त्वाचं आणि आकर्षक असं ध्येय मी त्यांच्यासमोर ठेवलं असतं!' (जणू आमदारक्या/मंत्रिपदं सोडून मंडळी या उग्र ध्येयमार्गानंच धावली असती!–पण माणसातल्या चांगुलपणावरच फक्त विश्वास ठेवणाऱ्या महात्म्यांना हे कधी, कसं उमजायचं?)

गेल्या वर्षभरात जे. पीं. ना निराशेचे तडाखे तर खूपच बसले आहेत. त्यांचं नाव घेत सत्तास्थानांवर चढणाऱ्या माणसांनी आता त्यांना साफ बाजूला टाकलंय्; पण तरीही या वर्षभरात, एखादा तरी असा प्रसंग घडला का, की ज्यामुळे त्यांना नवा धीर, नवी आशा, नवा उत्साह मिळावा?

'असा एखादा विशेष प्रसंग सांगता येईलसं वाटत नाही!' जे. पीं. नी स्पष्ट उत्तर दिलं, 'पण तरीही संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेशी अजूनही अनेक तरुणांची असलेली बांधिलकी मी महत्त्वाची मानतो. या ध्येयानं प्रेरित होऊन काम करणारी युवकांची पथकं अजूनही आहेत आणि भरीव कार्यक्रम आखून आवाहन केलं, तर आणखीही अनेक तरुण पुढं येतील.'

आयुष्यभर इतकं सगळं भोगल्यानंतरही या महात्म्याचा आंतरिक विश्वास आणि आशावाद अजूनही दृढ आहे, याचं आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही. विशेषतः युवाशक्तीबद्दलचा त्यांचा दुर्दम्य विश्वास आणि आशावाद अजूनही डळमळलेला नाही, याचं रहस्य काय असावं?

'परमेश्वरावरचा विश्वास यासारखे धार्मिक शब्द-कल्पना वापरायचे नसतील, तर असं म्हणता येईल की, माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर माझी श्रद्धा आहे, ही श्रद्धाच माझा आशावाद जिवंत ठेवते!' जे. पी. सांगतात.

–आणि याच श्रद्धेच्या, आशावादाच्या जोरावर, दर दिवसाआड डायलिसिसच्या दिव्यातून 'शुद्ध' होऊन बाहेर पडणारा हा शरशय्यासन्न राष्ट्रपितामह, उद्याच्या भारताची 'उषास्वप्नं' पाहण्यात मशगूल होऊन जातो, तेव्हा मुलाखत संपतेच. जे. पीं. चं निवासस्थान असलेल्या, पाटण्यातल्या 'महिला चरखा समिती'च्या त्या इमारतीतून बाहेर पडताना शेवटचा म्हणून मनात शिल्लक राहिलेला प्रश्न असतो तो एवढाच,

महात्म्यांच्या स्वप्नांना अपूर्णतेचा शापच असतो की काय? □



# पंतप्रधानांचा संदेश

अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य वगैरे बाबतीत आपल्या मातापित्यांतर्फे योग्य काळजी आणि दक्षता घेण्यात यावी, हा आपला हक्क आहे, अशी प्रत्येक बालकाची अपेक्षा असली तरी, आपल्या देशात अशी लक्षावधि मुले आहेत की, ज्यांना मातापित्यांच्या प्रेमाचे आणि दक्षतेचे छत्र मिळत नाही आणि ती तशीच मोठी होतात.

आपल्या मुलाबाळांकडे दुर्लक्ष व्हावे, असे कोणत्याच मातापित्यांना वाटत नाही; पण जेव्हा पोरवडा होतो तेव्हा जीवनाला आवश्यक अशा त्यांच्या किमान गरजा देखील पुरविणे मातापित्यांना अशक्य होते. त्याचा त्रास मुलांना भोगावा लागतो, मातापित्यांना भोगावा लागतो आणि राष्ट्राला पण भोगावा लागतो !

म्हणूनच, विकासाची फळे सर्व लोकांपर्यंत पोहोचवून त्यात त्यांना वाटा मिळावा या दृष्टीने आपण लोकसंख्येचे नियंत्रण करणे आवश्यक आहे.

या हेतूनेच कुटुंब नियोजनाला अग्रक्रम देण्यात येत आहे. आपण प्रत्येक कुटुंबात जाऊन, विशेषत: खेड्यापाड्यांतील प्रत्येक कुटुंबात जाऊन, त्यांच्या कल्याणासाठी कुटुंब नियोजनाच्या ज्या पद्धती उपलब्ध करण्यात आल्या आहेत, त्या पद्धतींचा अवलंब करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले पाहिजे.
कुटुंब नियोजनाची किती तीव्र आवश्यकता आहे हे लोकांना पटवून देण्यासाठी एक प्रचंड चळवळ उभारणे, सरकारचे आणि स्वयंसेवी संस्थांचे काम आहे.

ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा हा राष्ट्रीय कुटुंब कल्याण पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येत आहे त्यामुळे, राष्ट्रीय कल्याण कार्यक्रमाच्या प्रगतीची गति वाढविण्याच्या दृष्टीने, कुटुंब कल्याणाचा संदेश दुर्गम गावांपर्यंत नेण्यास मदत होईल, अशी मला आशा आहे. या प्रसंगी मी माझ्या शुभेच्छा पाठवून, समाजातील सर्व गटांतील लोकांनी हे राष्ट्रीय महत्कार्य यशस्वी करण्यास हातभार लावावा, असे आवाहन करतो.

नवी दिल्ली
२४ ऑगस्ट १९७८

**मोरारजी देसाई**

davp 78/245

# प्राप्तीकर नीट जमा करा, आकारणीत फायदा घ्या

ज्या अधिकृत बँकेत आपण कर-रक्कम जमा केली असेल त्या बँकेतर्फे देण्यात आलेल्या चालानाच्या काउंटर फाइलच्या आधाराने प्राप्तीकर अधिकारी आपली जमा कर-रक्कम गृहीत धरील.

आपण आपल्या खात्यात जमा केलेल्या कर-रकमेची प्राप्तीकर कार्यालयातील रेकॉर्डमध्ये ताबडतोब आणि व्यवस्थित नोंद व्हावी, अशी आपली इच्छा असणे साहजिकच आहे; पण त्या अर्थी खालील बाबतीत खात्री करून घ्या.

**योग्य चालानफॉर्मची निवड करा**

विविध प्रकारचे प्राप्तीकर जमा करण्यासाठी स्वतंत्र चालानफॉर्म असतात. या चालानफॉर्मचे प्रकार :—

| करभरणा | चालानफॉर्म |
|---|---|
| **आगाऊ कर** | |
| – कंपनीसाठी | आय. टी. एन. एस. ३५ ए |
| इतरांसाठी | आय. टी. एन. एस. ३५ |
| **स्वयं आकारणी कर** | |
| कंपनीसाठी | आय. टी. एन. एस. १६६ |
| इतरांसाठी | आय. टी. एन. एस. १६६ ए |
| **मोबदला देताना कर-कपात** | |
| पगारातून | आय. टी. एन. एस. १९१ |
| **इतर मोबदल्यातून** | |
| कंपनीच्या मोबदल्यातून | आय. टी. एन. एस. ३९ |
| इतरांच्या मोबदल्यातून | आय. टी. एन. एस. ३९ |

नियमित आकारणीप्रमाणे कर जमा करावयाचा असल्यास अधिकृत चालान, आपणास प्राप्तीकर अधिकाऱ्यातर्फेच देण्यात येईल.

**चूक चालन फॉर्मचा वापर करून भलत्या ठिकाणी त्याची नोंद झाल्यास अंतिम आकारणीच्या वेळी आपणास व्यर्थ त्रास होतो.**

**आपला चालान फॉर्म संपूर्ण आणि व्यवस्थित भरा.**

**खालील माहिती सुवाच्य लिहिली असल्याची खात्री करून घ्या.**

- ☐ आपले नाव आणि पत्ता
- ☐ आपल्या कायम खात्याचा क्रमांक
- ☐ आकारणी प्राप्तीकर कार्यालयाचे वॉर्ड आणि सर्कल
- ☐ आकारणी वर्ष
- ☐ प्राप्तीकराची रक्कम आणि त्यावरील सरचार्ज ( स्वतंत्रपणे )

चालान भरण्यात काही चूक केल्यास अथवा माहिती राहून गेल्यास त्यामुळे व्यर्थ उशीर आणि अंतिम एकूण आकारणीच्या कामात अडथळा येतो.

योग्य चालान फॉर्मची निवड करा आणि तो फॉर्म सत्य आणि संपूर्ण भरा. आपण जमा केलेल्या कर रकमेचा आपणास फायदा देण्यासाठी आम्हाला मदत करा.

निवेदक
**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
( रिसर्च, स्टॅटिस्टिक अँड पब्लिकेशन्स )
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
नवी दिल्ली – ११० ००१

davp 78/289 ( Marathi )